महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

भाग ६

# पोलिसांची भूमिका

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......




लेखक: मेधा देव, तृप्ती पांचाल,
RCI-VAW, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई
आणि
स्त्री अभ्यास केंद्र,
आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे - ४११००१

# मार्गदीपिका

## कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५

भाग ६

# पोलिसांची भूमिका

कौटुंबिक हिंसा पीडित महिलेला न्याय मिळवून देताना......




लेखक: मेधा देव, तृप्ती पांचाल,
RCI-VAW, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई
आणि
स्त्री अभ्यास केंद्र,
आयएलएस् विधी महाविद्यालय, पुणे

## ‘कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

हया कायद्याखाली नेमलेल्या

## अधिकारी आणि सेवा पुरविणाऱ्यांसाठी मार्गदीपिकांचे ७ भाग

| | | |
|---|---|---|
| भाग १ | लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा | - मिलिंद चव्हाण |
| भाग २ | न्यायदंडाधिकाऱ्यांची भूमिका | - जया सागडे |
| भाग ३ | संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |
| भाग ४ | वकिलांची भूमिका | - रमा सरोदे |
| भाग ५ | वैद्यकीय सेवा देणाऱ्यांची भूमिका | - संगीता रेगे<br>- पद्मा देवस्थळी<br>- सुजाता आयार्कर |
| भाग ६ | पोलिसांची भूमिका | - मेधा देव<br>- तृप्ती पांचाल |
| भाग ७ | सेवादायी संस्थांची भूमिका | - प्रसन्ना इनवल्ली |

© स्वीसएड, सर्व लेखक; आय्एल्एस् विधी महाविद्यालय आणि महिला व बाल विकास बिभाग, महाराष्ट्र राज्य.

प्रकाशक : मा. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११००१

२३.१२.२०१९

# संदेश

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा दिवाणी स्वरुपाचा महत्वाचा कायदा आहे. हया कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी अनेक घटकांवर जबाबदारी टाकलेली आहे. त्यातील न्यायाधिश आणि न्याययंत्रणा हा एक महत्वाचा घटक आहे.

कौटूंबिक हिंसेची समस्या गंभीर, गुंतागुंतीची आहे. पुरुषप्रधान आणि पितृसत्ताक समाजरचनेत, लिंगभावाधीष्ठीत होणारी हिंसा (शारीरिक, मानसिक, लैंगिक, आर्थिक, शाब्दिक) स्त्री–पुरुषामध्ये भेदभाव निर्माण करते. ही हिंसा स्त्रीच्या मानवी हक्कांचे आणि राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करते. हया पार्श्वभूमीवर कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाच्या कायदयाखालील येणाऱ्या प्रकरणांमध्ये न्यायालयांचा दृष्टीकोन अधिक संवेदनशिल असणे अपेक्षित आहे असे माननिय सर्वोच्च न्यायालयाने *कृष्णा भटाचारजी वि. सारथी चौधरी* (क्रिमिनल अपिल नंबर.१५४५/२०१५ निर्णय दिनांक २० नोव्हेंबर, २०१५) या न्यायनिर्णयात नमूद केलेले आहे.

कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ हा कायदा स्त्रियांच्या हितासाठी केलेला आहे. त्यामुळे कायद्यातील तरतुदीचा अन्वयार्थ लावताना एकापेक्षा जास्त अर्थ निघत असतील तर कायदयांच्या उद्दिष्टाला पूरक असा अर्थ निवडला पाहिजे. स्त्रियांना तो त्यांना जास्तीत जास्त न्याय्य कसा ठरेल हयाचा विचार व्हायला हवा.

आयएलस विधी महाविद्यालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने पुढाकार घेउन दंडाधिकाऱ्यांच्यासह संरक्षण अधिकारी, पोलीस, वैदयकीय अधिकारी, सेवा देणाऱ्या संस्था आणि वकील हयांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदीपिकांचे मी स्वागत करतो. या सर्व मार्गदीपिका कौटूंबिक हिंसेपासून स्त्रियांच्या संरक्षणाचा कायदा, २००५ मधील तरतुदींबाबत सर्वसमावेशक आहेत. विशेष म्हणजे 'लिंगभाव आणि कौटूंबिक हिंसा' ह्याविषयावरील स्वतंत्र मार्गदीपिका सर्व संबधित घटकांना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

सर्व हितसंबधाना माझ्या शुभेच्छा !

१६ ऑक्टोबर २०१८

(न्यायमुर्ती नरेश ह. पाटील)

# ऋणनिर्देश

“पीडब्ल्यूडीव्हीए कायद्याखालील सर्व हितसंबंधियांसाठी मार्गदीपिका तयार करणे” ह्या प्रकल्पाला दिलेल्या अर्थसाहाय्यासाठी आणि संकल्पनात्मक रचनेसाठी आम्ही ‘स्विसएड इंडियाचे’ ऋणी आहोत.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश माननीय न्यायमूर्ती श्री. नरेश पाटील ह्यांनी दिलेल्या संदेशाबद्दल आम्ही त्यांचे विशेष ऋणी आहोत.

अनेक सहकार्यांच्या सहभागामुळेच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला. या सर्वांचेही आम्ही ऋणी आहोत. त्यांचा नामनिर्देश पुढीलप्रमाणे:

**लेखक**

- मार्गदीपिका - वकिलांची भूमिका - रमा सरोदे, आणि त्यांचे सहकारी असीम सरोदे ‘सहयोग’, पुणे, आणि इतर वकील
- मार्गदीपिका - वैद्यकीय सुविधा देणाऱ्यांची भूमिका - संगीता रेगे, पद्मा देवस्थळी, आरथी चंद्रशेखर, सुजाता आयार्कर - सेहत (CEHAT), मुंबई, आणि ‘दिलासा’ केंद्राचे सहकार - चित्रा जोशी, मृदुला सावंत, संजना चिक्लेकर
- मार्गदीपिका - पोलिसांची भूमिका - मेधा देव, तृप्ती पांचाल - टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या, RCI-VAW आणि या विभागातील सहकारी - नंदकिशोर डहाळे, शीतल देवस्थळी, सुनिता पवार - मुंबई
- मार्गदीपिका - लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा - मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक, पुणे
- संरक्षण अधिकाऱ्यांची भूमिका लिहिताना प्रसन्ना इनवल्ली यांना महाराष्ट्र महिला-बाल विकास आयुक्तालय, आणि शहरी व ग्रामीण भागातील काही संरक्षण अधिकाऱ्यानी दिलेल्या माहितीबद्दल तसेच मार्गदीपिकेच्या कच्च्या मसुद्यावर प्रतिक्रया दिल्या बाबत आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**अनुवाद साहाय्य**

सुषमा देशपांडे

**इतर साहाय्य**

आय्एल्एस् विधी महाविद्यालयचे - अशोक माळवदे, योगेश सोनावणे, शुभांगी पुराणिक, प्रमोद राणे, हरिभाऊ दोडके, चंद्रकांत घुमे, वेंकट घतकार

**छपाई**

जलाराम कॉपियर्स, पुणे

**सर्वांना पुनः एकदा मनापासून धन्यवाद!**

## दोन शब्द ...

## सुरवात करताना ...

स्त्रियांवर होणारी कौटुंबिक हिंसा हा भारतातीलच नव्हे तर जगातील एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे. कौटुंबिक हिंसेचे गंभीर आणि दूरगामी परिणाम केवळ स्त्रियांच्या आयुष्यावरच नाही तर कुटुंब आणि समाजावर होत असतात. २००५ पर्यंत कौटुंबिक हिंसेचे प्रश्न हे फौजदारी कायद्यातून हाताळले गेले होते. मात्र त्यातून पीडित स्त्रीची कुटुंबात राहून हिंसा थांबावी ही इच्छा पुरी होत नव्हती. उलट हिंसा करणाऱ्या सासरच्या लोकांना तुरुंगवासाची शिक्षा होत होती. त्यामुळे, ती कुटुंबापासून तुटत होती. या पार्श्वभूमीवर देश भरातील महिला संघटनांनी/ सामाजिक संघटनांनी एकत्रित आवाज उठवून कौटुंबिक हिंसेसंदर्भात दिवाणी स्वरूपाचा कायदा हवा, अशी मागणी केली. लॉयर्स कलेक्टिवने पुढाकार घेऊन 'कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायद्याचे' प्रारूप तयार केले. देशातील वेगवेगळया भागांमध्ये जाऊन संघटनांबरोबर चर्चा करून या प्रारुपात बदल केले गेले आणि ते सरकारला सादर करण्यात आले. संसदेच्या दोन्ही गृहांनी या कायद्याला मान्यता दिली, आणि 'कौटुंबिक हिंसे पासून महिलांचे संरक्षण अधिनियम' *(पीडब्ल्यूडीव्हीए* - Protection Of Women from Domestic Violence Act) २००५ मध्ये अस्तित्वात आला. त्यानंतर या कायद्याखालील नियमांची बांधणी झाल्यावर २६/१०/२००६ रोजी या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली.

या कायद्याची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यापैकी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी नेमलेली यंत्रणा. ह्या यंत्रणेचे न्यायाधीश, संरक्षण अधिकारी, वकील, वैद्यकीय सेवा देणारे, सेवादायी संस्था आणि पोलीस हे घटक आहेत.

ह्या सर्व घटकांच्या ह्या कायद्याअंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये स्पष्ट करण्यासाठी स्त्री अभ्यास केंद्राने अनेक प्रशिक्षणे 'स्विसएड इंडिया'च्या आर्थिक साहायाने आयोजित केली. प्रत्येक प्रशिक्षणात 'लिंगभाव' या विषयावर  वर स्वतंत्र दीर्घ सत्र घेण्यात आले. अशी प्रशिक्षणे देशभर अनेक संस्था आयोजित करत होत्या. त्यामुळे अनेकांनी सर्व घटकांना उपयोगी होतील अशी मॅन्युअल्स तयार केली होती. मात्र मराठीत अशा प्रकारचे साहित्य उपलब्ध नव्हते. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक टप्प्यावर कसे काम करायचे, पिडीतेला न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणती पाऊले उचलायला पाहिजेत, काय खबदारी घ्यायची, इत्यादी मुद्द्यांच्या संदर्भात साहित्य निर्माण करण्याची गरज होती. स्त्री अभ्यास केंद्राने या कायद्याखालील नेमलेल्या यंत्रणेतील सर्व हितसंबंधीयांसाठी अशा प्रकारचे मराठीत साहित्य तयार करण्याचा दृष्टीने स्विसएड इंडियाच्या आर्थिक साहाय्याने एक प्रकल्प हाती

घेतला. या प्रकल्पाअंतर्गत १. **न्यायाधीश**, २. **संरक्षण अधिकारी**, ३. **वकील**, ४. **वैद्यकीय सेवा देणारे**, ५. **सेवादायी संस्था** आणि ६. **पोलीस** - ह्या प्रत्येक हितसंबंधियांसाठी स्वतंत्र मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

*पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याची बांधणी स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियांचे मुलभूत हक्क आणि मानवी हक्क यांची जपणूक आणि संवर्धन व्हावे या पायावर आधारित आहे. कौटुंबिक हिंसा स्त्रियांचा सन्मानाने जगण्याचा अधिकार काढून घेते आणि स्त्री-पुरुषामध्ये भेदभाव करते. या सर्व मुद्द्यांचा विचार करता स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेकडे लिंगभावाच्या दृष्टिकोनातून बघणे फार आवश्यक आहे. अर्थातच त्यासाठी लिंगभाव म्हणजे काय हेही स्पष्ट असायला हवे. म्हणून वरील सहा मार्गदीपिकांबरोबरच **'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा'** ही स्वतंत्र सातवी मार्गदीपिका तयार करण्याचे ठरविले.

ह्या सातही मार्गदीपिका लिहिण्यासाठी वेगवगळ्या हितसंबंधीयांच्या बरोबर *पीडब्ल्यूडीव्हीए* कायद्याखाली ज्यांनी विशेष काम केले आहे त्यांना लिहिण्याची विनंती करायची असे ठरवले. वकिलांसाठी सहयोग संस्था, पुणे; वैद्यकीय सेवा देणाऱ्यासाठी - सेहत संस्था, मुंबई; पोलिसांसाठी - टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई; यांना विनंती केली. 'लिंगभाव आणि कौटुंबिक हिंसा या मार्गदीपिकेसाठी' - श्री. मिलिंद चव्हाण, लिंगभाव प्रशिक्षक; यांना विनंती केली. सर्वानीच मार्गदीपिका लिहिण्याचे तत्परतेने मान्य केले. स्त्रीअभ्यास केंद्राने न्यायाधीश, संरक्षणअधिकारी आणि सेवादायी संस्था यांच्यासाठी मार्गदीपिका लिहिण्याची जबाबदारी घेतली.

ह्या सातही मार्गदीपिका आपल्यासमोर सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. केवळ स्विसएड इंडिया, ह्यांच्या आर्थिक साहाय्यामुळेच हे आम्हाला शक्य झाले.

ह्या मार्गदीपिका **सर्व हितसंबंधियांना आणि प्रशिक्षकांनाही** उपयुक्त ठरतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

**डॉ जया सागडे** — **प्रसन्ना इनवल्ली**

**मानद संचालिका** — **समन्वयक**

**स्त्री अभ्यास केंद्र,**

**आय्एल्एस् विधी महाविद्यालय, पुणे**

२० ऑक्टोबर २०१८

# महिला व बाल विकास आयुक्तालय

## महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते
GOVERNMENT OF MAHARASHTRA

२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस शेजारी, पुणे- ४११००१

फोन : ०२०- २६३३००४० Email : commissionerwcd@ymail.com

क्र. : मबाविआ/ ६२०५                                        दिनांक : २३/१२/२०१८

## "संदेश"

महाराष्ट्र राज्याने महिलांच्या विविध प्रश्नांवर व त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या उपायावर अनेक योजनांवर प्रगत पाऊले उचलली आहेत.राज्यपातळीवर कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ ची अंमलबजावणी महिला व बाल विकास विभागामार्फत सुरु आहे.या कायदयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संरक्षण अधिका-यांच्या नियुक्त्या करणे, त्यांचे प्रशिक्षण,त्यांच्या कार्यालयांना सोयी सुविधा पुरविणे, कायदयाच्या सनियंत्रणासाठी मुल्यांकन पध्दती विकसीत करून सांख्यिकी माहिती जिल्हा व तालुकास्तरावर अदयावत ठेवणे इ.अनेक महत्वाची कामे विभागामार्फत पार पाडली जात आहेत.

PWDVA २००५ कायदयाची अंमलबजावणीची जबाबदारी जरी विभागाची असली तरी या कायदयांतर्गत निश्चित केलेले सर्व स्टेकहोल्डर्स / सहभागी यंत्रणा यांची ही तितकीच महत्वाची जबाबदारी आहे. आय एल एस विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राने सर्व सहभागी यंत्रणा / स्टेकहोल्डर्स जसे की, संरक्षण अधिकारी, वकील,पोलीस,वैदयकीय सेवा देणारे,सेवादायी संस्था आणि मा. न्यायदंडाधिकारी यांच्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शिका हया अत्यंत उपयुक्त असून त्याचा वापर सर्व स्टेकहोल्डर्सनी स्वतःच्या दैनंदिन कामात करणे आवश्यक आहे.जेणे करून पिडीत महिलेला लवकरात लवकर सर्व सेवा देणे शक्य होईल.

या मार्गदर्शिकेमध्ये दैनंदिन कामातही उदाहरणे देऊन टप्प्या टप्प्याने सर्व स्टेकहोल्डर्सच्या / सहभागी यंत्रणाच्या भूमिका व जबाबदा-या अधिक स्पष्ट करून सांगण्यात आल्या आहेत व त्या प्रत्येकासाठी उपयुक्त आहेत.

याबदल आय एल एस् विधी महाविदयालयाच्या स्त्री अभ्यास केंद्राचे विशेष आभार व PWDVA २००५ या कायदयाच्या अंमलबजावणीसाठी काम करणा-या सर्व सहभागी संस्था / यंत्रणा यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा !

(डॉ.हृषीकेश यशोद )
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य,पुणे

मार्गदीपिका

‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

**पोलिसांची भूमिका**

# अनुक्रमणिका


१.० प्रस्तावना.....5

१.१ कौटुंबिक हिंसेच्या केसेस पोलिसांकडे कोणत्या मार्गाने येतात?.....6

१.२ कौटुंबिक हिंसा दर्शविणारे फौजदारी गुन्हे.....8

२.० सदर कायद्यांतर्गत असलेल्या महत्त्वाच्या व्याख्या.....9

२.१ ‘कौटुंबिक हिंसा’ म्हणजे काय ?.....9

२.२ ‘कौटुंबिक नातेसंबंध’ म्हणजे काय?.....11

२.३ सामायिक/संयुक्त/ एकत्रित घर म्हणजे काय?.....12

२.४ ‘पीडित व्यक्ती’ कोण?.....13

२.५ ‘जाब देणारी’ व्यक्ती कोण?.....13

३.० केसची सदर कायद्याखाली पात्रता आहे का? प्रकरण कौटुंबिक हिंसेचे आहे का ?.....14

४.० कौटुंबिक हिंसेविषयी आणि सदर कायद्या संदर्भात असलेले काही समज आणि सत्य परिस्थिती.....15

५.० सदर कायद्याखाली पोलिसांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या.....16

५.१ कारवाईपूर्व टप्पा.....18

५.१.१ कौटुंबिक हिंसेतील पीडितेस प्रत्यक्ष साहाय्य देणे.....18

कौटुंबिक हिंसेतील पीडितेचे स्वागत करा/ स्वीकारा-.....18

➢ **संवेदनशील पद्धतीने वागा :**.....18

➢ **समानुभूती बाळगा :**.....19

➢ **गुप्तता आणि खाजगीपणा बाळगा** :.....19

➢ **पीडितेला सन्मानाने वागवा :**.....19

➢ **खालील गोष्टी करणे टाळा** 19

पीडितेस सदर कायद्याची माहिती देणे 21

➢ **हक्कांविषयी माहिती :** 21

➢ **उपलब्ध असलेल्या मदतीचा / कायद्यांतर्गत मिळणाऱ्या आदेशांचा तपशील द्यावा** 22

➢ **तिची केस बंद झाल्यानंतरसुध्दा संरक्षण आदेशाची वैधता चालू राहते, हे सांगावे.** 23

➢ **आदेश बदलून मागण्याचा तिला हक्क असतो याची माहिती द्यावी.** 23

➢ **कौटुंबिक हिंसेला प्रतिसाद देताना सदर कायद्याखाली नेमेलेल्या वेगवेगळ्या यंत्रणांच्या समन्वयाच्या दृष्टिकोनाचा उपयोग करतो हे सांगावे.** 24

➢ **संरक्षण अधिकाऱ्यांच्या संदर्भात माहिती द्यावी** 25

➢ **विधी सेवा अधिकाऱ्यांची माहिती द्यावी** 26

➢ **भारतीय दंड संहितेच्या ४९८अ कलमाखाली केस लावता येते, हे सांगावे** 26

जर पीडितेने फौजदारी कायद्याखाली समांतर कारवाई करायचे ठरवले तर – 26

पीडितेच्या सुरक्षिततेसाठी उपाय करा 27

५.१.२. संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करणे (कारवाईपूर्व टप्पा) 31

➢ **पीडितेला मदत करण्यासंदर्भात संरक्षण अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे** 31

➢ **संरक्षण अधिकाऱ्यांनी पाठवलेले डीआयआर जपून ठेवणे/ संकलित करणे** 31

➢ **संरक्षण अधिकाऱ्यांनी पाठवलेल्या केसेसमध्ये गरज असल्यास फौजदारी दावा दाखल करणे** 31

➢ **अणीबाणीच्या प्रसंगी संरक्षण/ मदत देणे** 31

५.१.३ सदर कायद्याखाली अन्य सेवा-सुविधा यंत्रणेशी समन्वय 32

(कारवाईपूर्व टप्प्यात) 32

५.२. कारवाई चालू असतानाच्या टप्प्यात 34

५.२.१ पीडितेस थेट आधार देणे किंवा साहाय्य करणे 34

➢ **पोलिसांची मदत कोणत्याही टप्प्यावर मिळणे हा पीडितेचा हक्क आहे** .............35

➢ **नवी हिंसेची घटना घडल्यास नव्याने कायदेभंग/ गुन्हा होतो** ............................35

➢ **एफआयआऱ किंवा एनसी स्वरूपात हिंसेची कृती नोंदवावी व त्यानुसार कारवाई करावी** ..........................................................................................................................35

➢ **न्यायालयाने अंतरिम संरक्षण आदेश जारी केला असेल तर अंमलबजावणी साठी मदत करावी** .......................................................................................................................35

➢ **कलम 31 अन्वये अंतरिम किंवा कायमस्वरूपी आदेशाचा भंग झाल्यास फौजदारी दावा करता येतो**.....................................................................................................................35

५.२.२ संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करताना(कारवाई चालू असलेल्या टप्प्यात) .........36

➢ **नोटीस बजावण्यात साहाय्य** ..........................................................................................36

➢ **आदेशाची अंमलबजावणी करण्यात साहाय्य**......................................................36

➢ **स्त्रीधन परत मिळवण्यात साहाय्य**....................................................................37

➢ **शस्त्र जप्त करण्यात साहाय्य** ............................................................................37

➢ **अणीबाणीच्या प्रसंगी साहाय्य**...........................................................................38

५.२.३ सदर कायद्याखाली अन्य सहभागी घटकांबरोबर समन्वय .................................38

५.३ कारवाईनंतरचा(कायम स्वरूपी आदेश मिळाल्यानंतर) टप्पा ........................................39

५.३.१ पीडितेस थेट आधार / पाठिंबा देणे...................................................................39

➢ **आदेश अमलात आणण्यासाठी मदत करणे**.......................................................39

➢ **आदेशाचा भंग झाल्यास कारवाई**.........................................................................41

➢ **न्यायालयाच्या आदेशाचा भंग झाल्यास फौजदारी परिणाम** ...............................42

५.३.२ संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करणे...........................................................43

➢ **आदेश अमलात आणण्या करीता**.........................................................................43

➢ **आदेशाची अंमलबजावणी झाल्यानंतर पीडितेच्या सुरक्षिततेसाठी**........................43

परिशिष्ट.............................................................................................................................45

मार्गदीपिका

‘कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५’

# पोलिसांची भूमिका

## १.० प्रस्तावना

कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण अधिनियम, 2005 (ह्या कायद्याचा यापुढे ‘सदर कायदा’ असा उल्लेख केला आहे) हा 'कौटुंबिक हिंसे' ची दखल घेणारा आणि तिची व्याख्या करणारा पहिला अधिनियम आहे. या व्याख्येनुसार महिलांचे जे विविध प्रकारे छळ केले जातात ते विचारात घेतले आहेत.

हा एक लिंगाधिष्ठित दिवाणी कायदा असून महिलांचे कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण करण्यासाठी तो कार्यान्वित केला आहे. मग ती हिंसा कुटुंबात होणारी असो, एकत्र कुटुंबात नवऱ्यासह कोणी अन्य नातेवाईकांनी (स्त्री अथवा पुरुष) किंवा तिच्या माहेरच्या माणसांनी केलेली असो.

सदर कायदा लागू होण्याआधी भारतीय दंड संहिता, १८६० कलम ४९८-ए अन्वये फक्त पतीकडून किंवा सासरी ज्या महिलांवर हिंसा झाली आहे अशा विवाहित महिलांनाच दाद मागणे शक्य होते. त्यानुसार हिंसेसाठी जाब देणाऱ्यास शिक्षा होणे एवढ्यापुरताच हा तोडगा मर्यादित होता. परंतु हिंसा पीडितेस मात्र कुठल्याही प्रकारचा आधार मिळत नसे. याशिवाय, भारतीय दंड संहिता, १८६० कलम ४९८-ए हा फौजदारी कायदा असल्याने योग्य त्या 'पूर्ण खात्रीशीर पुराव्या’ अभावी (proof beyond reasonable doubt) जाब देणाऱ्यास शिक्षा करणे फार अवघड होत असे कारण कौटुंबिक हिंसेची घटना बहुतेक वेळा चार भिंतींच्या आड घडत असते, आणि त्यामुळे ठोस पुरावा, साक्षीदार मिळणे अवघड असे. माहेरच्या नातेवाईकांकडून (भाऊ, वडील इ.) हिंसा झाल्यास, दोन बायका असलेल्या विवाहात, मान्यता नसलेल्या विवाहात हिंसा झाल्यास कलम ४९८-ए अन्वये त्या पीडितेस आधार मिळत नसे.

सदर कायद्याने अनेक त्रुटी भरून काढल्या आहेत. हा कायदा म्हणजे महिलांना मिळालेले एक संरक्षक छत्रच आहे. त्यातून त्यांना अनेक प्रकारची सुरक्षा एकाच ठिकाणी तत्काळ मिळावी हा हेतू आहे, (उदाः कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण, घरात राहण्याचा हक्क, मुलांचा ताबा, आणि खर्च, पोटगी, इत्यादी; आणि त्या शिवाय कायद्याने ठरवून दिलेल्या/ मान्यता दिलेल्या यंत्रणेचा आधार, तज्ञांची मदत, वगैरे).

सदर कायद्याने अन्याय करणाऱ्याविरुध्द पिडीतेचे जे पाच महत्त्वाचे हक्क आहेत त्यांची दखल घेतली आहे.

- कौटुंबिक हिंसाचारापासून मुक्त राहण्याचा हक्क
- सामाईक/संयुक्त घरात राहण्याचा हक्क
- पोटगी मिळवण्याचा हक्क
- मुलांचा ताबा मिळण्याचा हक्क
- इजा झाल्यास त्याची नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क

म्हणून, सदर कायदा हा कायदा कुठल्याही प्रकारच्या कौटुंबिक हिंसेकडे महिलांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली अशा दृष्टीने बघतो आणि म्हणूनच त्या महिलेला सर्व प्रकारच्या हिंसेपासून संरक्षण मिळवून देण्याचे कर्तव्य सरकार आणि त्याच्या यंत्रणेवर सोपवितो. स्वतःच्या हक्कांचा पाठपुरावा करण्याकरता सदर कायद्यातील विविध सहभागी घटकांचा (स्टेकहोल्डर्स) पाठिंबा मिळवण्याचे स्वातंत्र्य महिलांना आहे. या व्यतिरिक्त हा कायदा लिंगाधिष्ठित आहे तसेच कल्याणकारी देखील आहे. सदर कायद्याअंतर्गत वेगवेगळी कर्तव्ये बजावणाऱ्यांनी देखील स्त्री-केंद्रित दृष्टिकोन ठेवला पाहिजे. म्हणजेच त्यांनी केसचा पाठपुरावा करताना महिलांच्या निवडीला आणि सुरक्षिततेला प्राधान्य देऊन केसवर काम करणे अपेक्षित आहे.

## १.१ कौटुंबिक हिंसेच्या केसेस पोलिसांकडे कोणत्या मार्गाने येतात?

कोणत्याही व्यक्तीने आपल्या हक्काचे उल्लंघन केल्याची तक्रार करण्यासाठी साधारणपणे पोलिसांकडे जाणे ही पहिली पायरी असते कारण पोलीस हा सर्वात प्रथम नजरेसमोर असलेला आणि ज्याच्यापर्यंत सहज पोचता येईल असा सरकारी मदतीचा हात असतो. म्हणून हिंसा पीडिता (कायद्यानुसार पीडित व्यक्ती) हिंसेच्या घटनेची मग ती कुठेही घडलेली असो, तक्रार करण्यासाठी किंवा मदतीसाठी पोलिसांकडे प्रथम जाण्याची शक्यता असते. हे तर सर्वमान्यच आहे की हिंसा करणे हा गुन्हा आहे आणि त्या पीडित व्यक्तीची योग्य ती दखल घेऊन तिचे आणखी होणाऱ्या छळापासून तसेच हिंसेपासून पोलीस संरक्षण करु शकतात.

कौटुंबिक हिंसेविषयी पोलिसांना कसे कळवले जाऊ शकते आणि ते सदर कायद्याच्या मर्यादेत कसे येईल ते खालील आकृतीत दर्शवले आहेः




**नोंद घ्या**: - यापैकी काही प्रसंगांची भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ (पीसीएमए), अल्पवयीनांसाठी न्याय अधिनियम, २०१५ (जे. जे. अधिनियम), बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण ) अधिनियम २०१५, हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ (डीपीए), लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांच्या संरक्षणाचा अधिनियम, २०१२ (पॉक्सो) इ. अन्वये 'कौटुंबिक हिंसा' या गुन्ह्याखाली तक्रार करता येते.

## १.२ कौटुंबिक हिंसा दर्शविणारे फौजदारी गुन्हे

सदर कायद्याखाली ज्यांना संबोधित करता येईल आणि कौटुंबिक हिंसेच्या केसेस म्हणता येतील अशा फौजदारी गुन्ह्यांची यादी खालील तक्त्यामध्ये सुचवली आहे.

| क्र. | गुन्हा | कलम |
|---|---|---|
| १. | पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून क्रौर्यपूर्ण वागणूक | भारतीय दंड संहिता कलम ४९८-ए |
| २ | आत्महत्येस प्रोत्साहन | भारतीय दंड संहिता कलम ३०६ |
| ३ | गर्भपातास कारणीभूत तसेच भ्रूणहत्या | भारतीय दंड संहिता कलम ३१२-३१६ |
| ४ | इजा आणि गंभीर दुखापत करणे | भारतीय दंड संहिता कलम ३१९-३२९, ३३६-३३८ |
| ५ | बलात्कार आणि लैंगिक गुन्हे | भारतीय दंड संहिता कलम ३७५-३७७, पॉक्सो |
| ६ | गुन्हेगारी उद्देशाने विश्वासघात,जर पती स्त्रीधन आणि तिच्या मालकीच्या वस्तु परत करण्यास राजी नसेल तर | भारतीय दंड संहिता कलम ४०५ आणि ४०६ |
| ७ | सजापात्र मनुष्यवध, खून आणि खुनाचा प्रयत्न | भारतीय दंड संहिता कलम२९९-३०४ |
| ८ | चुकीची कैद | भारतीय दंड संहिता कलम ३४० |
| ९ | चुकीच्या पध्दतीने अटक करण्यासाठी केलेला हल्ला किंवा बळजबरी | भारतीय दंड संहिता कलम ३५७ |
| १० | स्त्रियांचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने केलेला हल्ला किंवा बळजबरी | भारतीय दंड संहिता कलम ३५४ |
| ११ | फसवून केलेला विवाह आणि व्दिपत्नीत्व | भारतीय दंड संहिता कलम४९३-४९६ |
| १२ | हुंडा घेणे किंवा हुंडा मागणे सुध्दा | हुंडाप्रतिबंधक अधिनियम |
| १३ | बालविवाहास प्रतिबंध | बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम |
| १४ | लिंगनिदान करणे व लिंगनिदान झाल्यावर गर्भपात करणे | पीसीपीएनडीटी |

जर वरीलपैकी कोणत्याही केसमध्ये कौटुंबिक हिंसा झाली असेल तर कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायद्याखाली दिवाणी केस तसेच फौजदारी तक्रार एकाचवेळी त्या त्या संबंधित कायद्याखाली करता येते, आणि एका कारवाईमुळे दुसऱ्या कारवाईस बाधा येऊ शकत नाही.

सदर कायद्याच्या कलम 3 अन्वये कौटुंबिक हिंसा म्हणजे काय आणि इतर महत्त्वाच्या व्याख्या प्रथम समजून घेऊ या.

## २.० सदर कायद्यांतर्गत  असलेल्या महत्त्वाच्या व्याख्या

### २.१ ‘कौटुंबिक हिंसा’ म्हणजे काय ?

पीडितेवर जाब देणारा करत असलेले खालीलपैकी कोणतेही वर्तन म्हणजे कौटुंबिक हिंसा होय.

- छळाचा कोणताही प्रकार ज्यामुळे पीडितेच्या शारीरिक, मानसिक आरोग्यावर तसेच तिच्या स्वास्थ्यावर किंवा सुरक्षिततेवर परिणाम होणे
- हुंडा, मालमत्ता, किंवा अन्य मौल्यवान वस्तुंसाठी किंवा इतर बेकायदेशीर मागण्यांच्या पूर्ततेसाठी छळ करणे
- इजा किंवा अपाय करण्याची धमकी देणे

तिच्यावर केलेली  हिंसा ही शारीरिक, शाब्दिक, भाविनक, लैंगिक, आणि आर्थिक अशा कोणत्याही प्रकारच्या छळातून केलेली असू शकते. कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण नियम, २००६ च्या (ह्या नियमांचा यापुढे ‘सदर नियम’ असा उल्लेख केला आहे) सोबत जोडलेल्या नमुना फॉर्म  ४ नुसार कौटुंबिक हिंसेच्या कृतींचे चार गटात वर्गीकरण केले आहे. (फॉर्म ४ साठी परिशिष्ट १ पाहा)

ज्या कृतीतून छळ होतो/ हिंसा होते त्या खालील आकृतीत दर्शवल्या आहेतः

**शारीरिक छळ**

- शारीरिक इजा किंवा दुखापत होणाऱ्या कृती उदाः मारणे, लाथ मारणे, चिमटे काढणे, ढकलणे, चावणे पुरेसे जेवण न देणे, जाळणे
- कामाचा भार टाकणे/ अति श्रम करायला लावणे
- हिंसेस चिथावणी देणे
- जीवे मारण्याची प्रयत्न करणे, आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे
- गरोदरपणी हिंसा करणे, गर्भपातास कारणीभूत होणे

**लैंगिक छळ**

- कोणतीही अपमानास्पद किंवा मानहानिकारक लैंगिक कृती
- पतीकडून जबरदस्तीने संभोग
- इच्छेविरुध्द लैंगिक कृती करायला लावणे
- इच्छेविरुध्द अश्लील फिल्म पाहायला लावणे
- स्वतःच्या फायद्यासाठी महिलेचा दुसऱ्यांना रिझवण्यासाठी वापर
- इतरांना लैंगिक अनुभव देण्याची महिलेवर जबरदस्ती करणे

**शाब्दिक आणि भावनिक छळ**

- S
- अपमान करणे, कुचेष्टा करणे, इजा किंवा अपाय करण्याची धमकी देणे,
- शिवीगाळ करणे, नावे ठेवणे, बहिष्कृत करणे, मुलगा नाही म्हणून दोष देणे
- आईवडिलांना भेटण्यास मनाई करणे
- औषधोपचार घेण्यास विरोध करणे
- दारु पिऊन तसेच मादक पदार्थ सेवन करून शिवीगाळ करणे
- व्यभिचार आणि विवाहबाह्य संबंध ठेवणे
- महिलेच्या चारित्र्यावर संशय घेणे
- जीवे मारण्याची धमकी देणे

**आर्थिक छळ करणे**

- जीवनाच्या मूलभूत गरजांपासून किंवा हक्कांपासून वंचित ठेवणे ज्यामुळे इजा किंवा अपाय होऊ शकतो, उदाः जेवण न देणे, महिलेस हानिकारक होईल अशा तिच्या घरगुती वस्तुंचा निकाल लावणे, तिचे स्वतःचे स्त्रीधन किंवा संपत्तीची तिच्या मनाविरुध्द विल्हेवाट लावणे.
- हुंड्यासाठी छळ करणे, पैशासाठी मागणी करणे, स्त्रीधनाची विल्हेवाट लावणे
- घरातून बेदखल करणे, महिलेस व तिच्या मुलास -भाड्याच्या घरात राहत असल्यास भाडे न देणे
- पगार बळकावणे, महिलेस नोकरी / व्यवसाय / काम करू न देणे

हिंसा सहन करत असलेली स्त्री जर जाब देणाऱ्याशी कौटुंबिक नातेसंबंधात असेल आणि सामायिक/संयुक्त घरात राहत होती किंवा आत्ता राहत असेल तरच ती सदर कायद्याच्या खाली दावा दाखल करू शकते. पुढे जाण्याआधी आपण या दोन संकल्पना समजून घेऊ या.

## २.२ 'कौटुंबिक नातेसंबंध' म्हणजे काय?

कौटुंबिक नातेसंबंध म्हणजे सामायिक/संयुक्त घरात राहणाऱ्या स्त्री आणि पुरुषातील नातेसंबंध. खालील बाबींमध्ये कौटुंबिक नातेसंबंध[1] असतात

- विवाहामुळे - पत्नी, सुना, भावजया, विधवा, यांचे कुटुंबातील अन्य व्यक्तींशी असलेले संबंध
- रक्ताचे नातेसंबंध - आई- मुलगा, भाऊ - बहिणी, वडील - विधवा मुली, मुली इ.
- अन्य नातेसंबंध - दत्तकविधानामुळे, विवाहासारख्या/विवाहसदृश संबंधांमुळे (यात बेकायदेशीर विवाहातील पीडता, दोन बायकांशी फसवून केलेला विवाह, यांचाही समावेश होतो.)

'विवाहसदृश नातेसंबंध'[2] हे खाली दिलेल्या नातेसंबंधांच्या प्रकारात हेतुपूर्वक गणले जावे:

१. ज्यांचे विवाह बेकायदेशीर /अवैध[3] आहेत, द्विभार्या/ द्विपत्नी[4] आहेत, परंतु त्यांचे नातेसंबंध विवाहाचे अन्य निकष पूर्ण करतात.

२. ज्या स्त्रिया सामायिक/संयुक्त घरात विवाहसंबंधात पुरुषाबरोबर राहतात पण त्याचा विवाह[5] झालेला नसतो.

३. ज्या स्त्रिया पुरुषाबरोबर अनेक वर्ष एकत्र राहतात आणि बाहेरच्या जगातही नवरा-बायको[6] म्हणून वावरतात.

---

1 लॉयर्स कलेक्टिव, कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण २००५ या अधिनियमावर नेहमी विचारले जाणारे प्रश्न

2 उपरोक्त

3 मंदा आर. थोरे वि रामजी घनःश्याम थोरे MANU/MH/0427/2010, त्याचप्रमाणे पाहा चनमुनिया वि. वीरेंद्र कुमार सिंग कुश्वाहा 2011 Cr.L.J. 96 (Supreme Court),

4 प्रतिभा वि बापूसाहेब अंधारे भीमराव अंधारे यांचा मुलगा, I (2013) DMC 530 (Bombay H.C.) (2.11.2012

5 वेलुसामी वि. पटचैयामल AIR 2011 SC 479 (Supreme Court)

6 उपरोक्त हे सुध्दा पाहावे इंद्र शर्मा वि. विही.के.व्ही.शर्मा, AIR 2014 SC 309




दोन पक्षातील नातेसंबंध विवाहासारखे/ विवाहसदृश आहेत किंवा नाही याचा निर्णय घेण्यासाठी खालील बाबी विचारात घ्याव्यात:[7]

- सामायिक नावाचा/ आडनावाचा, रेशन कार्डचा, तसेच घराच्या पत्त्याचा वापर
- सामायिक/संयुक्त घराशी दोन्ही पक्षांची बांधिलकी
- बराच काळ एकत्र राहणे झाले आहे
- परस्पर आर्थिक अवलंबित्व, घरातील व्यक्तींशी असलेले आर्थिक किंवा इतर व्यवस्थेतील संबंध
- या नातेसंबंधातील मुलांचे अस्तित्व
- घर चालवण्यात तसेच मुलांची काळजी घेण्यात दोन्ही जोडीदारांची भूमिका

## २.३ सामायिक/संयुक्त/ एकत्रित घर म्हणजे काय?

संयुक्त/सामायिक घर म्हणजे जिथे पीडिता आणि जाब देणारा कौटुंबिक नातेसंबंधात असताना पूर्वी राहत होते किंवा राहत आहेत. त्यात भाड्याच्या घराचा, भाडेपट्टीवरील तसेच परवान्यावर घेतलेल्या घराचा किंवा एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या घराचा समावेश होतो आणि त्याची मालकी दोन्हींपैकी कोणत्याही पक्षाकडे असणे आवश्यक नाही. सामायिक/संयुक्त घर कोणते हे निश्चित करण्यासाठी फक्त हे सिध्द करावे लागते की ती पीडिता आणि जाब

7 http://pib.nic.in/newsite/feacontent.aspx?relid=119820

देणारा वर वर्णन केल्याप्रमाणे वैवाहिक नातेसंबंधात तेथे राहत असली पाहिजे किंवा राहिलेली असली पाहिजे .




## २.४ 'पीडित व्यक्ती' कोण?

सदर कायद्यानुसार पीडित व्यक्ती म्हणजे जाब देणाऱ्याबरोबर कौटुंबिक नातेसंबंधात असलेली आणि जिने जाब देणाऱ्याकडून तिच्यावर कौटुंबिक हिंसा झाल्याचा आरोप केला आहे अशी कोणतीही स्त्री. सदर कायद्यानुसार कोणताही पुरुष, पीडित व्यक्ती होऊ शकत नाही. आणि म्हणूनच डेनिसन पॉलराज वि युनियन गव्हर्नमेंट[8] या केसच्या निकालाप्रमाणे सदर कायद्यांतर्गत पुरुषांना संरक्षण दिले जाऊ शकत नाही.

## २.५ 'जाब देणारी' व्यक्ती कोण?

जाब देणारी व्यक्ती म्हणजे कोणताही प्रौढ पुरुष जो पीडितेबरोबर कौटुंबिक नातेसंबंधात असतो आणि ज्याच्या विरुध्द सदर कायद्यानुसार पीडितेने मदत मागितलेली असते. पीडित पत्नी अथवा विवाहसदृश नातेसंबंधात राहणारी महिला नवऱ्याच्या किंवा पुरुष जोडीदाराच्या नातेवाईकांविरुद्ध तक्रार दाखल करू शकते. हिरल पी. हरसोरा आणि अन्य, वि. कुसुम नरोत्तमदास हरसोरा आणि अन्य[9] या केसच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर, या अधिनियमानुसार स्त्री सुध्दा जाब देणारी असू शकते.

8 II (2009) DMC 252 (Madras H.C.) (03.04.2009)

9 (2016) 10 SCC 165

## ३.० केसची सदर कायद्याखाली पात्रता आहे का? प्रकरण कौटुंबिक हिंसेचे आहे का ?

आपल्याकडे अल्लेले प्रकरण कौटुंबिक हिसेंचे आहे का हे खालील तीन प्रश्न विचारून तपासावे

- ज्याविषयी तक्रार केली ती कृती कौटुंबिक हिंसेची आहे का?
- जाब देणाऱ्या आरोपीचे आणि पीडितेचे कौटुंबिक नातेसंबंध आहेत / होते का ?
- जाब देणाऱा आणि पीडिता सामायिक/संयुक्त घरात राहतात का? राहात होते का?

कौटुंबिक हिंसेने पीडित असलेल्या महिलेला सदर कायद्याखाली हिंसा करणाऱ्याच्या (जाब देणाऱ्याच्या) विरोधात दावा दाखल करण्याचा पूर्ण अधिकार आहे.




'कौटुंबिक हिंसा' म्हणजे 'संयुक्त/सामायिक राहत्या घरा' तील 'कौटुंबिक नातेसंबंधात' होणारी हिंसा

अशा पद्धतीने चाळणी लावून पोलीस अधिकारी पडताळणी करू शकेल की, ती महिला सदर कायद्याखाली मदत घेऊ शकते आहे किंवा नाही.

जर पीडिता सदर कायद्याखाली केस दाखल करण्यास पात्र असेल तर सदर कायद्याच्या कलम ५ अन्वये पीडितेस या कायद्याची माहिती देण्यास पोलीस अधिकारी कर्तव्यबध्द आहे. या विषयावर मार्गदीपिकेच्या पुढील भागात चर्चा केली आहे.

पुढे जाण्याआधी, सदर कायद्या बद्दल असलेले काही गैरसमज आपण पाहु या

## ४.० कौटुंबिक हिंसेविषयी आणि सदर कायद्या संदर्भात असलेले काही समज आणि सत्य परिस्थिती

| समज | सत्य |
|---|---|
| फक्त नवऱ्याने बायकोवर हिंसा केली तरच सदर कायद्याखाली केस करता येते. | या कायद्याअंतर्गत सर्व कौटुंबिक नातेसंबंधात झालेल्या हिंसेच्या केसेस येतात म्हणजेच वडील, भाऊ, दीर, सासरा, इ.नी केलेली हिंसा |
| पीडिता सदर कायद्याखाली केस करू शकते किंवा भारतीय दंडसंहितेच्या कलम ४९८-ए खाली केस करू शकते. | फौजदारी आणि दिवाणी (सदर कायद्यांतर्गत) कारवाई एकाच वेळी सुरू करता येते आणि कोणतीच कारवाई दुसऱ्या कारवाईस अडवू शकत नाही. |
| काही जातीतील किंवा धर्मातील पुरुष महिलांवर अधिक हिंसा करण्याची शक्यता असते कारण त्यांच्या संस्कृतीत ही एक सर्वसाधारण घटना असते. | महिलांवरील हिंसा ही समस्या सर्व जाती ,धर्म आणि वर्गामध्ये सारख्याच प्रमाणात आढळून येते. |
| बहुसंख्य कौटुंबिक हिंसा पीडित स्त्रिया अशिक्षित आणि किंवा आर्थिक दृष्ट्या कुटुंबावर अवलंबून असतात. | सुशिक्षित आणि आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र महिलांना सुध्दा कौटुंबिक हिंसेस तोंड द्यावे लागण्याचा धोका असतो. |
| महिलांवर हिंसा करणारे पुरुष त्यांच्या दैनंदिन जीवनात देखील आक्रमक असतात. | बायकोवर हिंसा करणारे बरेचसे पुरुष अन्य लोकांशी हिंसकतेने वागत असतील असे नाही. |
| काही वेळा महिला पुरुषांना हिंसक वागण्यास उद्युक्त करतात म्हणून हिंसा सहन करायला लागणे हा त्यांचाच दोष आहे. | हिंसा ही वादातीत आहे आणि महिलेची कोणतीही वागणूक तिच्यावर होत असलेल्या हिंसेचे समर्थन करू शकत नाही. |

आता कारवाईच्या सर्व टप्प्यांवर पोलिसांनी पीडितेस कशी मदत करावी हे आपण समजून घेऊ.

## ५.० सदर कायद्याखाली पोलिसांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

सदर कायदा हा मुळात दिवाणी स्वरूपाचा कायदा आहे. महिलांवर होणारी कौटुंबिक हिंसा थांबावी, त्यांना आधार मिळावा, हिंसेच्या परिणामांवर तोडगा असावा त्याचा विचार करून हा कायदा बनवला आहे. जरी पोलिसांचा फौजदारी कायद्याशी अधिक संबंध येत असला तरी सदर दिवाणी कायद्यातील तरतुदींनुसार पोलिसांची कौटुंबिक हिंसेच्या केसेस हाताळताना कोणती विशिष्ट भूमिका आणि कर्तव्ये असावीत ते ह्या कायद्यात नेमून दिले आहे. महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने जारी केलेल्या शासन परिपत्रक क्र DEA – ०२८/प्र क्र १७६ विशा – ६ दि १४ नोव्हेंबर २००८ कौटुंबिक हिंसेपासून महिलांचे संरक्षण कायद्यांतर्गत पोलिसांची भूमिका (कर्तव्य व जबाबदाऱ्या ) विशद करण्यात आल्या आहेत . या तरतुदीवर आधारित १४ नोव्हेंबर २००८ च्या परिपत्रक क्र. डीव्हीए ०२०८/ प्र.क्र १७६/ विशा-६[10] महाराष्ट्र शासनाने सदर कायद्याखाली पोलिसांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या आहेत.

**ह्या मार्गदीपिकेत पोलिसांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या तीन टप्प्यांमध्ये स्पष्ट केल्या आहेत-**

१. कायदेशीर कारवाई सुरू होण्यापूर्वी - कारवाईपूर्व टप्पा

२. कायदेशीर कारवाई सुरू असताना - कारवाईच्या मध्यातील/दरम्यान टप्पा

३. न्यायालयाने आदेश दिल्यावर - आदेशानंतरचा टप्पा

प्रत्येक टप्प्यातील महत्त्वाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या तीन महत्त्वाच्या बाबींशी संबंधित आहेत त्या अशा-

१. पीडितेस प्रत्यक्ष मदत करणे किंवा पाठिंबा देणे.

२. संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करणे.

३. सदर कायद्याने विहित केलेल्या कार्यपध्दतींची परिपूर्तता करण्यासाठी सर्व सहभागी घटकांशी (स्टेकहोल्डरशी) समन्वय साधणे.

---

10 परिशिष्ट क्र. २ मधील परिपत्रकाची प्रत पाहा

## उदाहरण

राधा एक विधवा असून तिचा पती तीन वर्षांपूर्वी वारला. त्याच्या मृत्युनंतर तिच्या सासरच्या मंडळींनी तिला एकत्र कुटुंबाच्या घरातून बाहेर पडायला भाग पाडले. त्या घरात ती नवऱ्याच्या मृत्युपूर्वी दहा वर्षांपासून तिच्या नवऱ्यासह सासू-सासऱ्यांबरोबर राहत होती. त्यामुळे तिला नवरा त्याच्या हयातीत जे दुकान चालवत होता त्याला लागून असलेल्या खोलीत स्थलांतरित व्हावे लागले. राधा या खोलीत दोन वर्ष सासरशी फारसा संबंध न येता शांततेने राहत होती. तथापि, गेल्या दोन वर्षांपासून राधाचा दीर तिला दुकान आणि त्या खोलीची मालकी देण्यासंबंधी त्रास देत आहे आणि धमकावत आहे. तो दुकानात येतो, तेथील मालाची नासधूस करतो, मोठमोठ्याने शिवीगाळ करतो, तसेच तिला मारण्याची आणि दुकानाबाहेर हाकलण्याची धमकी देतो.

अशा केसमध्ये राधा मदतीसाठी आणि स्वतःच्या जागेत शांतीने जगू देण्यासाठी पोलिसांकडे जाणे शक्य आहे. तथापि, केसची वस्तुस्थिती लक्षात घेता पोलीस हे सांगू शकले पाहिजेत की तिला सदर कायद्याखालीसुध्दा मदत घेण्याचा हक्क आहे. अशा प्रकारे, भारतीय दंड संहितेखाली फौजदारी तक्रार नोंदवण्याव्यतिरिक्त राधाला सदर कायद्याखाली केसचा पाठपुरावा करून तिच्या दिराविरुध्द संरक्षण आदेश (आणि कोणतेही अन्य संबंधित सहाय्य) मिळवण्याचा हक्क आहे.

# ५.१ कारवाईपूर्व टप्पा

| कारवाईपूर्व टप्पा- प्रकरणाची मांडणी |
| --- |
| ५.१.१ कौटुंबिक हिंसाचारातील पीडितेस प्रत्यक्ष साहाय्य देणे<br>कौटुंबिक हिंसेतील पीडितेस स्वीकारा<br>पीडितेस सदर कायद्याची माहिती देणे<br>जर पीडितेने फौजदारी कायद्याखाली समांतर कारवाई करायचे ठरवले तर<br>पीडितेच्या सुरक्षिततेसाठी उपाय करा |
| ५.१.२. संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करणे (कारवाईपूर्व टप्पा)<br>पीडितेला मदत करण्यासंदर्भात संरक्षण अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे<br>संरक्षण अधिकाऱ्यांनी पाठवलेले डीआयआर जपून ठेवणे<br>सरंक्षण अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या केसेसमध्ये महिलांची संमती असल्यास फौजदारी दावा दाखल करणे<br>अणीबाणीच्या प्रसंगी संरक्षण/ मदत देणे |
| ५.१.३ सदर कायद्याखाली अन्य सहभागी घटकांशी समन्वय (कारवाईपूर्व टप्प्यात)<br>वैद्यकीय सुविधांची मदत<br>आश्रयगृह, समुपदेशन इ<br>अणीबाणीच्या प्रसंगी सहभागी घटकांशी समन्वय |

## ५.१.१ कौटुंबिक हिंसेतील पीडितेस प्रत्यक्ष साहाय्य देणे

### कौटुंबिक हिंसेतील पीडितेचे स्वागत करा/ स्वीकारा-

➢ **संवेदनशील पद्धतीने वागा :**

कौटुंबिक हिंसेतील पीडितेसाठी पोलिसात, तसेच न्यायालयात येणे हा एक अतिशय अवघड अनुभव असतो याची जाणीव ठेवा. तिला अवघडल्यासारखे वाटू शकते, तिने जे अनुभव सोसले आहेत त्याविषयी बोलण्यास लाज वाटू शकते, तिच्यावर विश्वास ठेवला जाणार नाही अशी भीती वाटू शकते, आणि तक्रार केल्याचा समाजात काय परिणाम

होईल याची काळजी वाटू शकते. म्हणून पोलिसांनी त्या महिलेबरोबर काम करत असताना अधिक काळजीपूर्वक वागले पाहिजे आणि पीडितेच्या काय गरजा आहेत ते लक्षात ठेवले पाहिजे.

- **समानुभूती बाळगा :**

तिचे बोलणे शांतपणे ऐकून घ्या आणि तिच्या गरजा आणि त्रास काय आहे हे तिच्या चष्म्यातून/ नजरेतून बघा, जाणून घ्या, समजून घ्या.

- **गुप्तता आणि खाजगीपणा बाळगा** :

त्या महिलेस सुरक्षित जागी, जिथे इतर कोणी ऐकायला नसतील, अशा ठिकाणी घेऊन जावे म्हणजे ती हिंसेचा इतिहास न भिता सांगू शकेल.

- **पीडितेला सन्मानाने वागवा :**

हिंसेमुळे तिने आधीच खूप अपमान सहन केला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. पोलीस अधिकाऱ्याने तिचे म्हणणे आदरपूर्वक आणि तिच्यावर विश्वास दाखवून/ ठेऊन ऐकून घेतले तर ती अधिक आत्मविश्वासपूर्वक मदत मागू शकेल.

| ➢ **खालील गोष्टी करणे टाळा** |
|---|
| केसमध्ये 'तडजोड' करण्यासाठी मध्यस्थ किंवा समुपदेशक म्हणून काम करू नका (यासाठी पोलीस खात्याने नेमून दिलेल्या वेगळ्या यंत्रणा आहेत) |
| कोणत्याही पक्षास केस काढून घेण्याचा सल्ला देऊ नका किंवा परस्पर समझोता करण्याचा सल्ला देऊ नका |
| महिला सांगत असलेल्या हिंसेच्या अनुभवांकडे **संशयाने बघू नका**, तिची 'चूक' शोधण्याचा प्रयत्न करू नका - हिंसेला समर्थन नाही, हे लक्षात ठेवा |
| महिलेला असे प्रश्न **विचारू नका** की ज्यामुळे तीच "दोषी आहे" असे तिला वाटेल |

**खाली दिलेले प्रश्न टाळा**:[11]

- **होकारार्थी किंवा नकारार्थी प्रश्न टाळा.** काही ठोस घटनांच्या संदर्भात 'होय' किंवा 'नाही' असे उत्तर हवे असल्याशिवाय असे प्रश्न टाळा. उदा- तुम्हाला काही समस्या आहे का? असे प्रश्न विचारू नका
- **गुंतागुंतीचे प्रश्न टाळा**. उदाः अशी तक्रार केल्यास तुमच्या मुलांवर दीर्घकालीन काय परिणाम होईल असे तुम्हाला वाटते?
- **संदिग्ध प्रश्न टाळा**. उदाः लोकांची मातृत्वाबद्दल सर्वसाधारण काय धारणा असते?
- **एकाच वेळी अनेक प्रश्न विचारणे टाळा** उदाःतुमची नवऱ्यापासून फारकत घ्यायची तयारी आहे का? तुम्ही स्वतः आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आहात का? तुमचे आई वडील या निर्णयाला पाठिंबा देतील का?
- **समस्या किंवा धमकीवजा किंवा संस्कृतीसंबंधी संवेदनशील प्रश्न टाळा** उदाः तुमच्या जातीत पुरुष जात्याच हिंसक असतात हे तुम्हाला मान्य आहे का?
- **टीकात्मक (**judgmental **) प्रश्न टाळा.** उदाः तुम्ही जे काही केलेत त्याबद्दल तुम्हाला शरम वाटत नाही का?
- **उत्तर सूचित करणारे प्रश्न टाळा.** उदाःतुम्हाला जर काही करायचे असेल तर तुम्ही तुमच्या पतीस सोडले तर त्याचा फायदा होणार नाही का?
- **नावे ठेवणे किंवा कुचेष्टा करणे टाळा.** उदाः इतके स्वार्थी होऊ नका, स्वतःच्या कुटुंबाचा विचार करा.
- **अन्वयार्थ लावणे, किंवा विश्लेषण करणे टाळा** उदाः तुम्ही अशा प्रकारे प्रतिक्रिया देत आहात याचे कारण तुमचा अहंमन्यपणा. तो बाजूला ठेवा आणि याचा विचार करा. (त्या महिलेस वेगळे काही वाटत असेल.)
- **माघार घेण्यास सांगणे किंवा चेष्टा-विनोद करणे टाळा.** उदाः "तुम्ही दुसर काही का बोलत नाही!" असे म्हणायचे टाळा

11 लेईंग द फाऊंडेशनमधील प्रश्नांची यादी RCI-VAW ची प्रशिक्षण मार्गदर्शिका

## पीडितेस सदर कायद्याची माहिती देणे

सदर कायद्याच्या कलम 5 अन्वये पोलिसांनी पुढील माहिती द्यायची असते.

**कलम ५ पोलिसांनी द्यावयाची माहिती**

- अर्ज करण्याचा हक्क आणि सदर कायद्याखाली उपलब्ध असलेल्या मदतीचा तपशील
- सेवा पुरवणाऱ्यांच्या सेवांची उपलब्धता
- संरक्षण अधिकाऱ्यांच्या सेवेची उपलब्धता
- कायद्याचे मोफत साहाय्य मिळण्याचा हक्क
- भारतीय दंड संहितेच्या ४९८-ए अन्वये तक्रार करण्याचा हक्क

➢ **हक्कांविषयी माहिती :**

त्या महिलेस सदर कायद्याखाली अर्ज करण्याच्या तिच्या हक्काविषयी तसेच सदर कायद्याखाली न्यायालयाकडून ती जे साहय मिळवू शकते त्याची माहिती द्या. (ते साहाय्य म्हणजे संरक्षणाचा आदेश, आर्थिक मदतीचा आदेश, ताब्याचा आदेश, निवासाचा आदेश, भरपाईचा आदेश, किंवा या कायद्याखाली एकापेक्षा जास्त असे आदेश)

कृपया हे लक्षात ठेवाः माहिती देण्याचे कर्तव्य केले याचा अर्थ आवश्यकता असल्यास फौजदारी केस करण्याच्या जबाबदारीतून पोलिसांची सुटका झाली असा होत नाही. महाराष्ट्र शासनाच्या 'गृहखात्या'ने जारी केलेल्या शासकीय परिपत्रकात[12] मुद्दा क्र. १ मध्ये खालील प्रमाणे निर्देशित केले आहे.

> १) <u>कलम.५</u> पोलीसांना तक्रार प्राप्त झाल्यास अथवा कौटुंबिक हिंसाचाराच्या ठिकाणी उपस्थित असल्यास प्रस्तुत कायद्याने बाधित व्यक्तीस प्रदान केलेल्या अधिकाराची माहिती बाधित व्यक्तीस पोलीसांनी द्यावी मात्र गुन्हा दखल-पात्र घडल्याची माहिती मिळाल्यानंतर कायद्यानुसार अशा प्रकरणावर कार्यवाही करण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या कर्तव्यापासून पोलीस अधिकाऱ्यांची सुटका या कायद्याच्या कोणत्याही कलमामुळे होत नाही अशी तरतूद या कलमात आहे.

12 शासन परिपत्रक क्र. डीव्हीए ०२०८ / प्र. क्र. १७६ / विशा- ६

- **उपलब्ध असलेल्या मदतीचा / कायद्यांतर्गत मिळणाऱ्या आदेशांचा तपशील द्यावा**

हा कायदा तिला (पीडितेला) सहा प्रकारचे विशिष्ट साहाय्य पुरवतो. त्यांचा सारांश खालीलप्रमाणेः

**संरक्षणाचा आदेश कलम १८**

- अपराध्यास खालील गोष्टी करण्यापासून थांबवणे:
  - घरात आणि घराबाहेर हिंसा करण्यापासून किंवा हिंसेस मदत करण्यापासून, महिलेशी संपर्क ठेवण्यापासून, तिची मालमत्ता हिरावून घेण्यापासून, तिच्या कुटुंबीयांना तसेच तिला, हिंसेविरुध्द तिला साहाय्य करणाऱ्यांना धमकावण्यापासून

**निवासाचा आदेश कलम १९**

- महिलेस संयुक्तिक/ सामायिक/ एकत्रित घरातून हाकलून देण्यास अटकाव करणे, तसेच घरात शांततेने कुठलेही काम करण्याच्या तिच्या हक्कास बाधा आणण्यापासून अशा प्रकारे परावृत्त करणे की जेणे करून तिच्यावर आणखी हिंसा होणार नाही.

आर्थिक मदत कलम २०

- पोटगी, कौटुंबिक हिंसेमुळे कमाई गमावणे, वैद्यकीय खर्च आणि मालमत्तेचे नुकसान असे जे प्रत्यक्ष नुकसान झाले त्यासाठी मदत

**ताबा आदेश कलम २१**

- न्यायालय तिला मुलांचा तात्पुरता ताबा देऊ शकते.

**भरपाईचा आदेश कलम २२**

- पीडिता इजा झाल्यामुळे झालेल्या मानसिक नुकसानाबद्दल आणि दुःखाबद्दल भरपाईचा दावा करू शकते

**अंतरिम आदेश कलम २३**

- अंतिम निकालास बराच अवधी लागू शकत असल्याने न्यायालय वरीलपैकी कोणताही आदेश किंवा साहाय्य (जेव्हा कारवाई प्रलंबित असते) अंतरिम आदेश म्हणून देऊ शकते, जेणे करून पीडितेवरील पुढील हिंसा थांबते आणि तिला त्वरित साहाय्य मिळते

➢ **तिची केस बंद झाल्यानंतरसुध्दा संरक्षण आदेशाची वैधता चालू राहते, हे सांगावे.**

सदर कायद्याखाली न्यायालयाने दिलेला आदेश जोपर्यंत ती पीडिता त्यात बदल करण्यासाठी किंवा तो काढून टाकण्यासाठी स्वतः अर्ज करत नाही तोपर्यंत तो कार्यान्वित असतो.[13] यातून अशी हमी मिळते की जोपर्यंत महिला आदेशात बदल करून मागत नाही तोपर्यंत न्यायालयाने महिलेस दिलेले हक्क कायमस्वरूपी अबाधित असतात.

| उदाहरण |
| --- |
| नगमाने नवरा करत असलेल्या हिंसेविरुध्द संरक्षण आदेश मिळवला आहे. नगमाने अर्ज करून तो न्यायालयाला बदलायला सांगेपर्यंत तो आदेश कार्यान्वित आहे. त्या आदेशावरील तारखेनंतर १० वर्षांनंतर जरी नगमाच्या नवऱ्याने हिंसा केली तरी तो आदेशाचा भंग ठरू शकतो आणि नगमा त्याविरुध्द न्यायालयात जाऊन फौजदारी कारवाई करू शकते. |

➢ **आदेश बदलून मागण्याचा तिला हक्क असतो याची माहिती द्यावी.**

जर परिस्थितीत काही बदल झाला तर ती पीडिता न्यायालयाकडे सदर कायद्याच्या कलम २५(२) अन्वये अर्ज करून आदेशात सुधारणा अथवा बदल मागण्यासाठी अर्ज करू शकते. आदेशात सुधारणा व बदल होण्यासाठी न्यायालयास विनंती करू शकते.

| **उदाहरण** |
| --- |
| सुनीताने स्वतःच्या आणि मुलीच्या खर्चासाठी पतीने दरमहा ५००० रु. द्यावेत अशी पोटगीच्या आदेशातून मागणी केली. त्यानंतर तिच्या मुलीस वारंवार रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करावे लागेल अशी वैद्यकीस समस्या आली. मुलीच्या या वाढत्या वैद्यकीय खर्चामुळे ती पोटगीच्या रकमेत वाढ करून मिळण्यासाठी पुढील तारखेच्या आदेशात बदल करून मिळावा यासाठी अर्ज करू शकते.<br>दियाला तिच्या मुलाचा तात्पुरता ताबा मिळण्यासाठी आदेश मिळाला आहे. परंतु त्याच काळात पालकत्वाच्या कायद्याखाली कायमस्वरूपी ताबा मिळविण्याची कारवाई प्रलंबित होती. अशा वेळेस न्यायालयाने तिला तिच्या मुलाचा कायम स्वरूपी ताबा दिला आहे. आता ती सदर कायद्याखाली न्यायालयात जाऊन तात्पुरत्या ताब्याचा आदेश रद्द करून घेऊ शकते. |

13 सदर कायदा कलम २५

- **कौटुंबिक हिंसेला प्रतिसाद देताना सदर कायद्याखाली नेमेलेल्या वेगवेगळ्या यंत्रणांच्या समन्वयाच्या दृष्टिकोनाचा उपयोग करतो हे सांगावे.**

सदर कायदा देत असलेल्या प्रतिसादात महिलेला अनेक प्रकारच्या यंत्रणांची मदत मिळू शकते, त्यांचे कार्य काय आहे आहे याबद्दल पीडितेस माहिती द्यावी.

सदर कायद्यांतर्गत पीडितेला आधार देण्याकरता काही यंत्रणा नेमल्या आहेत. उदाः - संरक्षण अधिकारी,सेवा पुरवणाऱ्या संस्था, पोलीस, वैद्यकीय अधिकारी,आणि न्यायदंडाधिकारी/ न्यायालय यांना काही अधिकार दिलेले आहेत व त्यांची कर्तव्ये देखील कायद्यात दिलेली आहेत. कायद्यानुसार हे अधिकारी पीडितेच्या वैद्यकीय साहाय्य, आश्रयगृहाची सुविधा, कारवाईपूर्व समुपदेशन, आणि पाठिंबा अशा गरजांनुसार महिलेस आधार देण्यास बांधील असतात.




- नोंदीकृत सेवा पुरवणाऱ्यांची यादी संपर्काच्या तपशिलासह पीडितेला द्यावी

त्या पीडितेस त्या त्या क्षेत्रात नोंदीकृत सेवा पुरवणाऱ्यांची संपर्काच्या तपशिलासह आणि ते कौटुंबिक हिंसा पीडितेस आधार देण्यासाठी कुठली सेवा पुरवतात त्याच्या तपशिलासह यादी द्या.

सदर कायद्याच्या संदर्भात सेवा पुरवणारी स्वयंसेवी संस्था असते, जिची नोंदणी सदर कायद्याखाली (राज्य शासनाकडे) पीडितेस साहाय्य आणि पाठिंबा देण्यासाठी झालेली असते. पीडिता तिच्या गरजांनुसार नोंदीकृत सेवा पुरवणाऱ्यांचे साहाय्य घेते. त्यात

अधिनियमानुसार तक्रार नोंदवणे, कायद्याची मदत, वैद्यकीय सुविधा, समुपदेशन आणि अन्य साहाय्य यांचा समावेश होतो.

[नोंदीकृत सेवा पुरवणाऱ्यांव्यतिरिक्त काही नोंदीकृत नसलेल्या संस्था असतात त्या महिलांना आधार देतात परंतु या संस्थांना सदर कायद्याखाली तक्रार दाखल करण्याचा अधिकार नसतो. फक्त सेवा पुरवणाऱ्या सेवादायी संस्था महिलेची इच्छा असल्यास सदर कायद्याखाली तक्रार दाखल करू शकतात.]

➢ **संरक्षण अधिकाऱ्यांच्या संदर्भात माहिती द्यावी**

पीडिता ज्या क्षेत्रातील असेल त्या क्षेत्रातील संरक्षण अधिकाऱ्यांच्या सेवेच्या उपलब्धतेविषयी माहिती तिला द्या. म्हणजेच कौटुंबिक हिंसा पीडितेस साहाय्य करण्यात त्यांची भूमिका आणि कर्तव्ये काय असतील ते सांगावे. संबंधित संरक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचा संपर्क तपशील द्यावा.

- कौटुंबिक हिंसेच्या केसमध्ये लक्ष केंद्रित करून काम करण्यासाठी सदर कायद्याने संरक्षण अधिकाऱ्यांचे पद निर्माण केले आहे. हे अधिनियमानुसार अंमलबजावणी करणारे महत्त्वाचे अधिकारी आहेत. संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्ये अशी आहेतः पीडितेस तक्रार करण्यास मदत करणे, न्यायदंडाधिकाऱ्यांकडे आदेशासाठी अर्ज दाखल करणे, तिला समुपदेशन तसेच वैद्यकीय मदत मिळण्यासाठी साहाय्य करणे, तसेच न्यायालयाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी होत आहे की नाही हे पाहणे. सध्या महाराष्ट्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा संरक्षण अधिकारी आणि राज्याच्या प्रत्येक तालुक्यात कनिष्ठ संरक्षण अधिकारी नेमले आहेत. त्यांचे पत्ते, फोन नंबर, आपल्याकडे असायला हवे.
- जर पीडितेने फौजदारी कारवाईऐवजी किंवा त्याच्या जोडीला सदर कायद्याखाली कारवाई सुरू करण्याचे ठरवले तर आवश्यक त्या कारवाईसाठी संरक्षण अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पीडितेस डीआयआर दाखल करण्यासाठी किंवा पुढील साहाय्य घेण्यासाठी त्यांच्याकडे पाठवावे. गरज असल्यास सोबत महिला पोलीस द्यावी.

➢ **विधी सेवा अधिकाऱ्यांची माहिती द्यावी**

पीडितेने जर न्यायालयात जाण्याचे ठरवले तर तिला संबंधित जिल्ह्याच्या कायदा/ विधी सेवा प्राधिकरणाकडून कायद्याचे निःशुल्क साहाय्य उपलब्ध असून ते घेण्याचा तिला हक्क आहे हे सांगावे.

➢ **भारतीय दंड संहितेच्या ४९८अ कलमाखाली केस लावता येते, हे सांगावे**

जिथे संबंध आहे अशा बाबतीत भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ए अन्वये तिला तक्रार दाखल करण्याचा हक्क आहे हे सांगावे.

## जर पीडितेने फौजदारी कायद्याखाली समांतर कारवाई करायचे ठरवले तर –

अधिनियमाच्या कलम 5 खाली दिलेल्या कर्तव्यांपुरतीच पोलिसांची भूमिका मर्यादित नाही. पीडितेच्या गरजांनुसार आणि केसच्या वस्तुस्थितीनुसार फौजदारी कायद्याखाली समांतर कारवाई सुरू केली जावी. पीडितेस एकाच वेळी सदर कायद्याखाली आणि फौजदारी कायद्याखाली कारवाई सुरू करण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

- पीडितेने ज्या कृत्यांविषयी तक्रार केली आहे त्यानुसार भारतीय दंड संहितेतील तरतुदींखाली किंवा पॉक्सो, पीसीएमए, डीपीए खाली सुद्धा सकृद्दर्शनी दखलपात्र गुन्हा असल्यास एफआयआर दाखल करून फौजदारी कारवाई सुरू करण्याचा तिला हक्क आहे हे तिला सांगून आणि तिच्या संमतीने फौजदारी कारवाई सुरू केली जावी.
- अन्य सर्व केसेसमध्ये नोंदला गेलेला गुन्हा जर दखलपात्र होण्याइतका फार गंभीर स्वरूपाचा नसेल तर त्या प्रसंगाची अदखलपात्र गुन्हयाच्या बुकात नोंद केली जावी कारण त्यातून पीडितेने सहन केलेल्या प्रत्येक हिंसक घटनेच्या पुराव्यांची मालिका असू शकते.

| उदाहरण |
|---|
| ○ पीडिता १८ वर्षांखालील असेल आणि पतीकडून तसेच सासरच्या माणसांकडून हिंसा होत असल्याची तक्रार करत असेल तर पोलिसांकडून पीसीएमए खाली कारवाई सुरू केली जावी.<br>○ पीडिता १८ वर्षांखालील असेल आणि सासर किंवा माहेरच्या कुटुंबीयांकडून लैंगिक हिंसा होत असल्याची तक्रार असेल तर पॉक्सोखाली कारवाई सुरू केली जावी. |

**पीडितेस जर फौजदारी कारवाई सुरू करायची नसेल तर पोलिसांनी काय करावे?**

अशा वेळेस पोलीस स्टेशन मधील दैनंदिन डायरीत नोंद करावी की डीआयआरमधील माहितीप्रमाणे आरोपीशी जवळचे नाते असल्यामुळे पीडितेस सदर कायद्याखाली दिवाणी कारवाई करायची आहे आणि तिला दिल्या गेलेल्या माहितीनुसार तिने विनंती केल्यावर एफआयआऱची[14] नोंद करण्यापूर्वी हे प्रकरण योग्य चौकशीसाठी प्रलंबित ठेवले जावे.

## पीडितेच्या सुरक्षिततेसाठी उपाय करा

बऱ्याचशा केसेसमध्ये पीडितेवर होत असलेली हिंसा त्वरित थांबवणे गरजेचे असते आणि तिच्या भावी सुरक्षिततेसाठी उपाय योजणे आवश्यक असते, ते खालील प्रकारे करता येते:

- ➢ वेगवेगळ्या कायद्याने पोलिसांना हिंसेला प्रतिबंध करण्यासाठी काही अधिकार दिले आहेत, त्याचा वापर करावा. उदाः -
  - कायद्याने भारतीय दंडसंहितेच्या कलम १०७, १०९, ११०, १११ अन्वये जाब देणाऱ्याकडून चांगल्या वर्तनाचे हमीपत्र लिहून घेणे,
  - तसेच भारतीय दंडसंहितेच्या कलम १५१ अन्वये जाब देणाऱ्याला दखलपात्र गुन्ह्यास प्रतिबंध करण्यासाठी त्याला अटक करणे,
  - महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियमुसार कलम ९३ अन्वये चांगल्या वर्तनाची हमी घेणे म्हणजे पीडितेवर होणारी हिंसा त्वरित थांबवून तिला खात्रीशीर सुरक्षा मिळेल

  असे अधिकार कौटुंबिक हिंसेच्या दाखल केलेल्या केसमध्ये सर्व टप्प्यांवर वापरावे आणि महिलांवरील हिंसा थांबवावी आणि ती आणि तिची मुले सुरक्षित आहेत हे सुनिश्चित करावे.

- ➢ पीडितेवर जाब देणाऱ्याचा किती दबाव आहे आणि तो किती धमकी देत आहे यावर तिच्यासाठी सुरक्षिततेची योजना आखावी. पीडितेस साहाय्य करून तिला किती धोका आहे याचा अंदाज घ्यावा आणि तसेच तिला सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्यक्ष करता येतील अशा योजना आखण्यास मदत करावी .

---

14 सदर नियमांच्या फॉर्म १ अनुक्रमांक ८ प्रमाणे

➢ तक्रार दाखल केल्यामुळे जर जास्त धोका वाटत असेल तर घरी भेटी देऊन, फोन करून, शेजारी चौकशी करून नियमित पाठपुरावा केला जावा त्यामुळे पीडितेच्या सुरक्षिततेची आणि हिताची खात्री करून घेता येते. सुरक्षा योजना तयार करण्यासाठी आणि तिची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी संरक्षण अधिकारी आणि सेवा पुरवणाऱ्यांमध्ये असलेल्या समन्वयाचा वापर केला जावा.

## पोलिसांनी सुरक्षा नियोजन तयार करावे

- जेव्हा पीडिता हिंसेच्या प्रसंगाची तक्रार करते तेव्हा तिला आणि तिच्या मुलांना आणखी हिंसेस तोंड द्यावे लागणार नाही ना याची खात्री करून घ्यावी आणि तिला जी हवी असेल ती मदत मिळण्यास साहाय्य करावे.
- सुरक्षा योजना बनवण्यासाठी पीडितेला संरक्षण अधिकाऱ्यांकडे पाठवता येते. जिथे तात्काळ मदतीची गरज असते तिथे आणि किंवा संरक्षण अधिकाऱ्यांची सेवा उपलब्ध नसते तिथे सदर नियमाच्या 'फॉर्म ५' अन्वये पोलीस पीडितेसाठी सुरक्षा योजना बनवू शकतात. (फॉर्म ५ साठी परिशिष्ट ३ पाहा)
- फॉर्म ५ मधील 'ए', 'बी' व 'सी' या रकान्यात हिंसेच्या प्रकारांचा तपशील, अशा हिंसेचे परिणाम, त्याबद्दलची पीडितेची भीती इ. नमूद केले आहे आणि फॉर्म ५ मधील 'डी' रकान्यामध्ये सुरक्षिततेसाठी योजायचे उपाय व पर्याय यांची नोंद आहे त्याचा उपयोग पीडिता करू शकते.
- जेव्हा फॉर्म ५ मधील तपशील पुरवून पोलीस अधिकारी पीडितेस साहाय्य करत असतील तेव्हा 'सी' आणि 'डी' रकान्यामधील तपशील पोलिसांनी पीडितेच्या सल्ल्याने आणि संमतीने भरावा.
- सुरक्षा योजना बनवण्याचा एक हेतू म्हणजे हिंसा झाल्यावर आणि ती होत असताना पीडिता कोणत्या प्रकारे स्वतःला सुरक्षित ठेवू शकते ते ओळखणे आणि गंभीर अपाय होण्याचा धोका कमी करणे. हे करण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यानी पीडितेबरोबर धोक्याचा अंदाज घ्यावा आणि तिच्या सुरक्षिततेसाठी पराकोटीची काळजी घ्यावी. जोखीमीच्या अंदाजात खालील मुद्दे येतात[15]

---

15 लॉयर्स कलेक्टिव, वरून घेतलेले अहिंसेतून कौटुंबिक हिंसेचा शेवटः सदर कायद्याच्या संरक्षण अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शिका, १२८ (पहिली आवृत्ती, २००९)

- ➢ जर दोन्ही पक्ष विवाहाच्या नातेसंबंधात असतील आणि नुकतेच विभक्त झालेले असतील, किंवा पीडिता विभक्त होण्याच्या प्रयत्नात असेल
- ➢ पीडितेस जर असा दाट विश्वास असेल की तिला फार मोठा धोका आहे.
- ➢ पूर्वानुभव आणि हिंसेचे ठरावीक प्रकार : मागील हिंसेची वारंवारिता,तीव्रता,आणि हिंसक घटनांची वेळ हे वर्तमान आणि भावी धमक्यांचे प्रभावी निर्देशक असतात.
- ➢ जाब देणाऱ्याकडून धमक्या
- ➢ धमकावणे, छळ करणे आणि पाठलाग करणे यासारखे पूर्वीचे प्रसंग
- ➢ जाब देणाऱ्याने हल्ला केल्याची किंवा कायदा हातात घेतल्याची पूर्व घटना
- ➢ दारु पिणे किंवा मादक पदार्थांचे सेवन करणे
- ➢ महिलांची विशिष्ट नाजूक परिस्थिती उदाः गरोदरपण, आर्थिक दृष्ट्या पूर्ण अवलंबित्व, कुठलाही आधार नसणे इ.

▪ सुरक्षा योजनेत अनेक पर्याय दिलेले असावेत आणि पीडिता ज्या अनेक परिस्थितींमध्ये असू शकेल त्यासाठी तयारीत असावे. उदाः पीडिता घर सोडण्याची तयारी करत असताना, किंवा तिच्या नोकरीच्या जागी असताना इ. यातील प्रत्येक परिस्थितीत वेगळ्या प्रकारची जोखीम असू शकेल. संबंधित पोलीस अधिकाऱ्यानी पीडितेस या प्रत्येक संदर्भातील जोखीमेचा अंदाज घेण्यासाठी साहाय्य करावे आणि विशिष्ट परिस्थितीचा सामना करण्यासाठी पर्याय निर्माण करावेत. म्हणजे जर एखादी योजना फसली तर पीडिता तिची योजना बदलून दुसऱ्या पर्यायाचा विचार करू शकते.

▪ सुरक्षा नियोजन यासाठी केले जातेः[16]

- ➢ पीडितेस आणखी अपाय होण्याचा धोका कमी करण्यासाठी साहाय्य करणे
- ➢ हिंसेची पुनरावृत्ती होऊ शकते ह्या वस्तुस्थितीवर भर देणे आणि पीडितेस आणि मुलांना धोक्याची पातळी किती आहे ह्याची जाणीव देणे.
- ➢ धोका ओळखण्याचा आणि त्याचा अंदाज कसा घेता येतो याची माहिती देणे आणि त्यावर विचार करणे
- ➢ हिंसक व्यक्तीचा सामना करण्याची त्या महिलेची सध्याची पद्धत काय आहे यावर चर्चा करणे, व त्यामध्ये स्वतःच्या सुरक्षिततेसाठी कोणते बदल आवश्यक आहेत, हे ठरवणे
- ➢ पीडितेच्या गरजा काय आहेत त्याप्रमाणे सेवा पुरवणाऱ्या संस्थांची मदत घेणे

16 वरील १५ प्रमाणे

- ➢ पीडितेस आणि तिच्या मुलांना अनेक पर्याय देणे, उदाः विशेषतः स्वतःच्या घरात राहण्याचा पर्याय
- ➢ पीडितेस आणि तिच्या मुलांना त्यांच्या सुरक्षिततेत वाढ करायला सांगणे.
- ➢ हिंसा करणाऱ्या व्यक्तीपासून सुरक्षा नियोजनाबद्दल गुप्तता बाळगणे
- ➢ पोलिसांनी सातत्याने सुरक्षा प्रक्रियेत सहभागी होण्याची गरज आहे. (एका घटने पुरते नाही)
- ➢ सर्व पीडित महिलांना सुरक्षा नियोजनाची गरज असते, मग ती हिंसा करणाऱ्या पासून विभक्त असो अथवा एकत्र राहत असो.

काही विशिष्ट परिस्थितीत सुरक्षेच्या पर्यायाची उदाहरणे[17]

- <u>हिंसक प्रसंग घडत असताना</u>

  जर वादविवाद झाले तर पीडितेने कमी धोका असलेल्या कुठल्याजागी जायचे किंवा घराबाहेर कसे पडायचे हे ठरवावे. ज्या जागांना बाहेर पडण्यासाठी दार नसते (उदाः बाथरूम किंवा भिंतीतील कपाटे) किंवा ज्या जागेत कुठलेही शस्त्र सहज मिळू शकते अशा जागा (उदाः स्वयंपाकघर) सुरक्षित असत नाहीत.
- <u>घर सोडण्याची तयारी</u>

  जर पीडितेने घर सोडले तर तिने कोणाशी संपर्क साधावा किंवा कोणाच्या घरी जावे याची यादी तयार करावी. संकटकाळात उपयोगी पडतील असे फोन नंबर तिला लक्षात ठेवायला सांगावे तसेच फोन करण्यासाठी काही पैसे नेहमी बाजूला ठेवायला सांगावेत.
- <u>घर सोडल्यावर</u>

  पीडिता आर्थिक दृष्टीने अवलंबून असेल तर तिला हिंसेस अधिक तोंड द्यावे लागू शकते म्हणून तिला आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होता यावे यासाठी सुरक्षा योजनेत अशा पर्यायांचा समावेश असावा.
- <u>तिच्या कामाच्या ठिकाणी</u>

  कामाच्या ठिकाणी तिच्या सहकाऱ्यांना पीडितेच्या परिस्थितीची कल्पना देऊन ठेवावी म्हणजे ते तिला येणाऱ्या फोन कॉलची पडताळणी करण्यात, तसेच जाब देणाऱ्याने तिच्याशी संपर्क साधायचा अथवा तिचा शोध घ्यायचा प्रयत्न केल्यास तिला त्याविषयी सावध करण्यास साहाय्य करतील. दुसरा पर्याय म्हणजे एखाद्या व्यक्तीस कामावर जाताना प्रवासात सोबत नेणे, नेहमीचा मार्ग बदलून जाणे.

---

17 वरील १५ प्रमाणे

## ५.१.२. संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करणे (कारवाईपूर्व टप्पा)

➢ **पीडितेला मदत करण्यासंदर्भात संरक्षण अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे**

कौटुंबिक हिंसेची केस आल्यावर महिलेची संमती असल्यास संरक्षण अधिकाऱ्यांकडे डीआयआर फाईल करण्यास व पुढील साहाय्य करण्याकरिता पाठवावे व त्यासंदर्भात औपचारिक पत्र द्यावे

➢ **संरक्षण अधिकाऱ्यांनी पाठवलेले डीआयआर जपून ठेवणे/ संकलित करणे**

कौटुंबिक हिंसेच्या सर्व केसेसमध्ये संरक्षण अधिकाऱ्यांनी तयार केलेले डीआयआर संबंधित पोलीस स्टेशनकडे पाठवले जातात. या डीआयआरच्या प्रती स्वतंत्र फायलीत नीट ठेवल्याच पाहिजेत. जर पीडितेने फौजदारी कारवाई सुरू करण्याचे ठरवले तर असा डीआयआर पीडितेवर झालेली कौटुंबिक हिंसा सिध्द करण्यासाठी कागदोपत्री पुरावा म्हणून उपयोगी पडतो.

➢ **संरक्षण अधिकाऱ्यांनी पाठवलेल्या केसेसमध्ये गरज असल्यास फौजदारी दावा दाखल करणे**

संरक्षण अधिकारी फौजदारी दावा दाखल करण्यासाठी कौटुंबिक हिंसेच्या केसेस पोलिसांकडे पाठवू शकतात. अशा सर्व केसेसमध्ये योग्य ती फौजदारी कारवाई सुरू केली जावी. याशिवाय, या केसेसमध्ये तात्काळ हिंसा थांबावी यासाठी फौजदारी दंडसंहितेच्या खाली येणाऱ्या अधिकारांचा पोलिसांनी वापर करावा आणि संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर पीडितेच्या सुरक्षेचे नियोजन करावे.

➢ **अणीबाणीच्या प्रसंगी संरक्षण/ मदत देणे**

संरक्षण अधिकाऱ्याला पोलिसांचीसुध्दा (किंवा सेवा पुरवणाऱ्यांची) अणीबाणीच्या प्रसंगी पीडितेपर्यंत तिच्या घरी पोहोचण्यासाठी आणि सदर कायद्याखाली कारवाई सुरू करण्यासाठी मदत घेता येते. अशा केसेसमध्ये पुरेसा पाठिंबा दिला जावा. याशिवाय, या केसेसमध्ये तात्काळ हिंसा थांबावी यासाठी आणि डीआयआरची नोंद करताना आणि नंतर सुरक्षा निश्चित करण्यासाठी फौजदारी दंडसंहितेच्या खाली येणाऱ्या अधिकारांचा (उपरोक्त वर्णन केल्याप्रमाणे) पोलिसांनी वापर करावा.

## ५.१.३ सदर कायद्याखाली अन्य सेवा-सुविधा यंत्रणेशी समन्वय (कारवाईपूर्व टप्प्यात)

- पीडित महिलेला माहिती तर दिली जावीच परंतु जर पीडितेने काही शारीरिक इजा किंवा वेदना झाल्याची तक्रार केली तर तिला तात्काळ वैद्यकीय साहाय्य दिले जावे आणि तातडीची वैद्यकीय तपासणी[18] करण्यासाठी नजिकच्या वैद्यकीय सुविधेकडे पाठवले जावे. अशा तपासणीचे अहवाल इजेच्या आणि उपचाराच्या, तपशिलासह त्याची एफआयआर / एनसी म्हणून नोंद ठेवली जावी.

- पीडितेस आधार गृह, समुपदेशन इ. जास्तीच्या आधार व सुविधांची गरज आहे का याचा अंदाज घ्या आणि तिचा त्या विभागातील संबंधित सेवा पुरवणाऱ्याशी संदर्भपत्र देऊन संपर्क करून द्या, आणि शक्य असेल तितके पीडितेस संबंधित सेवा पुरवणाऱ्यांकडून साहाय्य मिळाले की नाही त्याची खात्री करून घ्या.

| चांगली पध्दत |
|---|
| जर एखाद्या परिस्थितीमध्ये सदर कायद्याखालील भागधारक आपले कर्तव्य बजावत नसतील तर कायद्याची अंमलबजावणी करणारी एक जबाबदार संस्था म्हणून पोलिसांनी पीडित महिलेला सर्व सुविधा मिळत आहेत की नाही हे पाहावे. उदाहरणार्थ- आधार गृहाने जर महिलेला प्रवेश नाकारला तर पोलिसांनी त्या महिलेला आधार गृहाची सुविधा मिळवून द्यावी. |

? **पीडितेस जर तिच्यात आणि जाब देणाऱ्यात हिंसा थांबावी म्हणून पोलिसांनी समझौता घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा असे वाटत असेल तर काय करावे**?

जर महिलेस समुपदेशनाची गरज असेल तर सेवा पुरविणाऱ्यांबद्दल आणि समुपदेशना बद्दल माहिती सांगावी, आणि तिला भावनिक आणि मानसिक आधार देण्याविषयी योग्य त्या ठिकाणी संदर्भपत्र देऊन पाठवावे. तसेच महिलांच्या आणि मुलांच्या साहाय्यासाठी असलेला खास कक्ष, महिला सुरक्षा समिती (पी एस पातळीवर), महिलांसाठी असलेला कक्ष, महिला विशेष साहाय्य कक्ष, महिला दक्षता समिती, महिला तक्रार निवारण केंद्र, इ. मध्ये पोलीस यंत्रणेखाली उपलब्ध असलेल्या कारवाई पूर्व समुपदेशन सेवा देण्यात

18 नियमांच्या फॉर्म १ अनुक्रमांक 8 प्रमाणे (फॉर्म १ साठी परिशिष्ट ४ पाहा).

तिला साहाय्य करावे. १४ नोव्हेंबर २००८ च्या शासन परिपत्रकानुसार पोलिसांनी मध्यस्थी किंवा समुपदेशन करण्याबाबत तरतूद नाही आणि त्यांनी तसे करू नये.

- वर उल्लेख केल्याप्रमाणे अणीबाणीच्या प्रसंगी पीडितेपर्यंत तिच्या घरी पोहोचण्यासाठी आणि सदर कायद्याखाली कारवाई सुरू करण्यासाठी सेवा पुरवणाऱ्याने पोलीसांची मदत घ्यावी.
- वर स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी अशा केसेसमध्ये महिलेस निश्चित सुरक्षा मिळावी आणि डीआयआरचे रेकॉर्डिंग करून ते लवकरात लवकर न्यायदंडाधिकाऱ्यांपढे सादर केले जावे म्हणून त्वरित साहाय्य दिलेच पाहिजे.[19]

19 वरील १८ प्रमाणे

## ५.२. कारवाई चालू असतानाच्या टप्प्यात

| ५.२ कारवाई चालू असतानाच्या टप्प्यात - प्रकरणाची मांडणी |
|---|
| ५.२.१ पीडितेस थेट आधार देणे किंवा साहाय्य करणे<br>पोलिसांची मदत कोणत्याही टप्प्यावर मिळणे हा पीडितेचा हक्क आहे<br>नवी हिंसेची घटना घडल्यास नव्याने कायदेभंग/ गुन्हा होतो<br>एफआयआऱ किंवा एनसी स्वरूपात हिंसेची कृती नोंदवावी व त्यानुसार कारवाई करावी<br>न्यायालयाने अंतरिम संरक्षण आदेश जारी केला असेल तर अंमलबजावणीसाठी मदत करावी<br>कलम ३१ अन्वये अंतरिम किंवा कायमस्वरूपी आदेशाचा भंग झाल्यास फौजदारी दावा करता येतो |
| ५.२.२ संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करताना<br>नोटीस बजावण्यात साहाय्य<br>आदेशाची अंमलबजावणी करण्यात साहाय्य<br>स्त्रीधन परत मिळवण्यात साहाय्य<br>शस्त्र जप्त करण्यात साहाय्य<br>अणीबाणीच्या प्रसंगी साहाय्य |
| ५.२.३ सदर कायद्याखाली अन्य कायद्याखाली मान्यता असलेल्या सहभागी घटकांबरोबर समन्वय |

### ५.२.१ पीडितेस थेट आधार देणे किंवा साहाय्य करणे

सदर कायद्याखाली चालू असलेली केस अनिर्णित असताना पीडिता पोलिसांचे साहाय्य मागू शकते.सदर कायद्याखाली तक्रार केलेली असूनसुध्दा तिला हिंसेचा अनुभव येऊ शकतो आणि ती हिंसा थांबविण्यासाठी आणि या टप्प्यावरसुध्दा तिच्या सुरक्षेविषयी मदत मागण्यासाठी पोलिसांकडे जाऊ शकते. अशा वेळेस पोलिसांनी खालील गोष्टी कराव्यातः

- **पोलिसांची मदत कोणत्याही टप्प्यावर मिळणे हा पीडितेचा हक्क आहे**

सदर कायद्याखाली केस चालू असताना सुध्दा जर हिंसेची ताजी घटना घडली तर पोलिसांचा प्रतिसाद मिळवण्याचा पीडितेस हक्क आहे हे समजून घ्यावे. तसेच पोलिसांची कौटुंबिक हिंसाग्रस्त महिलेस मदत मिळावी यासाठीच DIR (कौटुंबिक घटना अहवाल ) ची एक प्रत संरक्षण अधिकाऱ्यांकडून पोलिसांकडे पाठविण्यात येते.

- **नवी हिंसेची घटना घडल्यास नव्याने कायदेभंग/ गुन्हा होतो**

सदर कायद्याखाली केस चालू असतानासुध्दा जर हिंसेची ताजी घटना घडली तर त्या प्रत्येक घटनेच्या वेळी पुन्हा नव्याने कायदेभंग/ गुन्हा म्हणून नोंद करावी.

- **एफआयआऱ किंवा एनसी स्वरूपात हिंसेची कृती नोंदवावी व त्यानुसार कारवाई करावी**

सकृद्दर्शनी दखलपात्र गुन्हा असेल तर एफआयआऱ दखल करावा पण त्याआधी पीडितेस पूर्ण माहिती देऊन तिची संमती घ्यावी. अदखलपात्र गुन्हा असल्यास एनसी रजिस्टरमध्ये नोंद केली जावी. जर पीडितेची फौजदारी कारवाई करण्याची इच्छा नसेल तर वर स्पष्ट केल्याप्रमाणे पीडितेने सहन केलेल्या हिंसेचे कालक्रमानुसार रेकॉर्ड राहावे म्हणून तशी नोंद रोजच्या डायरीत केली जावी.

- **न्यायालयाने अंतरिम संरक्षण आदेश जारी केला असेल तर अंमलबजावणी साठी मदत करावी**

सदर कायद्याखाली चालू असलेल्या कारवाईनुसार न्यायालयाने अंतरिम संरक्षण आदेश जारी केला आहे का याची पीडितेशी बोलून खात्री करून घ्यावी. जर तसे असेल तर हिंसेच्या कोणत्याही घटनेस अंतरिम आदेशाचा भंग मानून तिला सदर कायद्याच्या 31 कलमान्वये आणि नियम 15(4) अन्वये दखलपात्र गुन्हा मानले जावे आणि त्यानुसार फौजदारी कारवाई सुरू केली जावी.

- **कलम 31 अन्वये अंतरिम किंवा कायमस्वरूपी आदेशाचा भंग झाल्यास फौजदारी दावा करता येतो**

कलम 31 अन्वये आदेश भंगाचा आरोप करताना जर सकृद्दर्शनी असे आढळून आले की हिंसेचा प्रसंग हा जारी असलेल्या भारतीय दंड संहितेखालील कलम ४९८-ए, डीपीए, पॉक्सो, पीसीएमए किंवा भारतीय दंड संहितेच्या अन्य तरतुदींनुसार गुन्हा ठरत असेल तर त्या आरोपांचाही त्यात समावेश करावा.[20]

---

20 सदर नियम १५

### ५.२.२ संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करताना(कारवाई चालू असलेल्या टप्प्यात)

- **नोटीस बजावण्यात साहाय्य**

  जाब देणाऱ्यावर नोटीस बजावण्याच्या वेळी जाब देणारा आणि त्याचे कुटुंबीय मारहाण करतील अशी भीती वाटत असेल तर अशा केसेसच्या बाबतीत संरक्षण अधिकारी पोलिसांचे साहाय्य मागू शकतात. अशा सर्व केसेसमध्ये संरक्षण अधिकाऱ्यांनी न्यायालयाकडून, पोलिसांनी नोटीस बजावावी किंवा ती बजावताना साहाय्य द्यावे असा निर्देश देणारा आदेश मिळवला तर पोलिसांना त्या आदेशाची परिपूर्ती करावी लागेल.

| सर्वोत्तम पध्दत |
|---|
| सदर कायद्याखालील केसेसच्या बाबतीत एकत्र काम करण्याचे हे चांगले उदाहरण आहे. काही संरक्षण अधिकाऱ्यांनी आणि पोलीस स्टेशनने अशी तजवीज केली आहे की संरक्षण अधिकाऱ्यांना जेव्हा पोलीस साहाय्याची गरज असते तेव्हा ते तशी विनंती थेट संबंधित पोलीस स्टेशन अधिकाऱ्यांकडे करतात. त्या विनंतीनुसार कर्मचारी उपलब्ध असतील तर नोटीस बजावण्यात आणि आदेशाची अंमलबजावणी करण्यात योग्य ते साहाय्य मिळते. असे केल्यास नोटीस वेळेत बजावली जाऊ शकते. अशी व्यवस्था पीडितेच्या दृष्टीने चांगली आहे. |

- **आदेशाची अंमलबजावणी करण्यात साहाय्य**

न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशात अशी सूचना असू शकते की स्थानिक पोलिसांनी आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांना साहाय्य करावे[21]. अशा सर्व केसेसमध्ये संरक्षण अधिकाऱ्यांना आणि किंवा पीडितेस आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ते साहाय्य केले जावे.

गृहविभागाने जारी केलेल्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकातील[22] मुद्दा क्र. ३ आणि ४ पोलीस अधिकाऱ्यांना खालील बाबीत सूचना देतात.

---

21 सदर कायदा Section कलम 19(5), 19(7) and 20(4) सदर कायदा

22 १४ नोव्हेंबर २००८चे शासन परिपत्रक क्र.डिव्हीए ०२०८/प्र.क्र.१७६/विशा-६. परिपत्रक परिशिष्ट २ पहा

३) **कलम १९ (५)** :- कलम १९ (१) अन्वये रहिवासाचे आदेश देतांना किंवा कलम १९(२) अन्वये बाधित व्यक्तीला संरक्षण किंवा सुरक्षा पुरविण्याचे आदेश देताना अथवा प्रतिवादीस कलम १९(३) अन्वये हमीपत्र द्यायचे आदेश पारित करतांना न्यायालय जवळील पोलीस ठाण्याचे अंमलदार यास बाधित व्यक्तीस संरक्षण देण्याचे किंवा सदर आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत बाधित व्यक्तीस सहकार्य करण्याचे निर्देश देऊ शकेल.

४) **कलम १९ (७)** :- संरक्षण आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करण्याबाबत दंडाधिकारी पोलीस ठाण्याच्या अंमलदारांला निर्देश देऊ शकतील.

आदेशाच्या अंमलबजावणीत साहाय्य करणे यात पीडितेस संरक्षण देणे, निवासाचा आदेश असल्यास घर ताब्यात घेण्यात मदत करणे, संरक्षणाच्या आदेशाचे पालन होते की नाही हे पाहणे इत्यादी. चा समावेश होतो.

- **स्त्रीधन परत मिळवण्यात साहाय्य**

ज्या केसेसमध्ये पीडितेच्या मालकीच्या वस्तू विशेषतः स्त्रीधन सासरी राहिले असेल आणि जाब देणारा ते परत देण्यास नकार देत असेल तर संरक्षण अधिकारी न्यायालयाच्या आदेशानुसार त्या वस्तू परत मिळवण्याकरता पोलिसांचे साहाय्य घेऊ शकतात. अशा सर्व केसेसमध्ये भारतीय दंड संहितेतील कलम ४०६ अन्वये तक्रार नोंदवता येते आणि त्या वस्तू परत मिळवण्याकरता पोलिसांकडून स्वतंत्र फौजदारी कारवाई सुरू करता येते. ज्या केसेसमध्ये हिंसेचा धोका आहे अशा ठिकाणी स्त्रीधन परत मिळवण्याकरता पीडितेबरोबर आणि संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर जाऊन पोलीस साहाय्य देऊ करतात आणि त्यांच्या सुरक्षिततेची हमी घेतात.

- **शस्त्र जप्त करण्यात साहाय्य**

तक्रार केलेल्या हिंसक प्रसंगात वापरलेले शस्त्र जप्त करण्यासाठी पोलिसांचे साहाय्य घ्यावे असा आदेश न्यायालय संरक्षण अधिकाऱ्यांना देऊ शकते.[23] अशा सर्व केसेसमध्ये पोलिसांनी जप्तीच्या प्रसंगी आवश्यक ती मदत करावी. पोलिसांनी पीडितेसंबंधित केसमध्ये त्यांच्या नोंदी ठेवलेल्या डायरीत शस्त्रांचा तपशील पोलीस रेकॉर्ड म्हणून नोंदवून ठेवावा. जप्त केलेले शस्त्र सुरक्षित ठेवण्यासाठी संरक्षण अधिकाऱ्यांकडे व्यवस्था नसते तेव्हा जप्त केलेले शस्त्र सुरक्षित जतन करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये ठेवण्याची व्यवस्था करावी .

---

23 सदर कायद्याच्या नियम 10(1) (f)

- **अणीबाणीच्या प्रसंगी साहाय्य**

संरक्षण अधिकाऱ्यांनी अणीबाणीच्या प्रसंगी मदत घ्यावी आणि अशा सर्व प्रकारच्या केसेसमध्ये मदत करावी.

## ५.२.३ सदर कायद्याखाली अन्य सहभागी घटकांबरोबर समन्वय

फौजदारी कारवाई सुरू करण्याव्यतिरिक्त, पीडितेच्या तातडीच्या गरजा कोणत्या आहेत त्याचा अंदाज घ्या आणि त्यानुसार सेवा पुरवणाऱ्यांकडे, आश्रयगृहांकडे आणि वैद्यकीय सुविधा देणाऱ्यांकडे तिला पाठवा; सोबत संदर्भ पत्र देखील द्यावे.

## ५.३ कारवाईनंतरचा(कायम स्वरूपी आदेश मिळाल्यानंतर) टप्पा

| ५.३ कारवाईनंतरचा (कायम स्वरूपी आदेश मिळाल्यानंतर) टप्पा |
|---|
| ५.३.१ पीडितेस थेट आधार / पाठिंबा देणे<br>आदेश अमलात आणण्यासाठी मदत करणे<br>निवासाचा आदेश<br>आर्थिक आदेशः<br>मुलांचा तात्पुरता ताबा आदेश<br>भरपाई<br>आदेशाचा भंग झाल्यास कारवाई<br>न्यायालयाच्या आदेशाचा भंग केल्यास फौजदारी परिणाम |
| ५.३.२ संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करणे<br>आदेश अमलात आणण्याकरीता<br>आदेशाची अंमलबजावणी झाल्यानंतर पीडितेच्या सुरक्षिततेसाठी |

### ५.३.१ पीडितेस थेट आधार / पाठिंबा देणे

➢ **आदेश अमलात आणण्यासाठी मदत करणे**

- न्यायालयाने पारित केलेल्या आदेशात संरक्षण आदेश, पोटगीचा आदेश, निवासाचा आदेश, मुलांच्या ताब्याचा तात्पुरता आदेश, आणि भरपाईचा आदेश यांचा समावेश असतो. असे आदेश अमलात आणण्यासाठी पोलिसांनी संरक्षण अधिकाऱ्यांना साहाय्य करावे.
- सदर कायद्याखाली न्यायालयाने जाब देणाऱ्याच्या विरोधातील कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करण्यास पीडितेस साहाय्य करावे; विशेषतः अशा केसेसमध्ये जिथे जाब देणाऱ्याची आदेशाचे पालन करण्याची तयारी नाही.
- सदर कायद्याच्या कलम 28(1) आणि नियम 6(5) अन्वये अशा तरतुदी आहेत की भारतीय दंड संहितेच्या १२५ कलमान्वये आदेश जारी करण्याची जी पद्धत आहे. त्याप्रमाणेच सदर कायद्याचे आदेश जारी केले जावे. यात फौजदारी कारवाई असल्याने, न्यायालय साहाय्य करण्याचा निर्देश पोलिसांना देउ शकते. तथापि, ज्या

केसेसमध्ये असे निर्देश दिले नसतील, अशा केसेसमध्ये देखील संरक्षण अधिकाऱ्यांनी विनंती केल्यास त्यांना साहाय्य दिले जावे.

**<u>निवासाचा आदेश</u>**

- निवासाच्या आदेशाबाबतीत त्याच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेत न्यायालय पोलिसांना पीडितेस आधार आणि संरक्षण देण्याचा निर्देश देऊ शकते.
- या व्यतिरिक्त, न्यायालय जाब देणाऱ्यावर हिंसा थांबवण्यासाठी हमीखाली किंवा हमीशिवाय असा बाँड बजावू शकते[24]. न्यायालयाच्या अशा निर्देशात, भारतीय दंड संहितेच्या चॅप्टर ८ अन्वये आदेश स्थापित करू शकतो (म्हणजे शांतता आणि चांगले वर्तन ठेवण्याची हमी) या बाँडचा भंग केल्यास भारतीय दंड संहितेच्या चॅप्टर ८ अन्वये पोलिसांनी निवासाचा आदेश प्रभावीपणे वापरण्यासाठी त्यांच्या अधिकाराचा वापर करावा.[25]

| केसचे उदाहरणः निवासाचा आदेश जारी करणे |
|---|
| सरस्वतीने तिच्या नवऱ्याबरोबर आणि सासू सासऱ्यांबरोबर संयुक्त/सामायिकघरात राहू देण्याची परवानगी मागणारा आदेश न्यायालयाकडून मिळवला होता. निवासाचा आदेश असूनही तिचा नवरा दाराला कुलुप लावून तिला घरात येण्यास मनाई करत होता. निवासाचा आदेश जारी करण्याबाबत ती न्यायालयात गेली, नजिकच्या पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यास दंड न्यायालयाने निर्देश दिला की निवासाचा तसेच संरक्षणाचा आदेश जारी करावा आणि रेव्हेन्यू इन्स्पेक्टरच्या उपस्थितीत घराचे दार तोडून सरस्वतीसाठी राहायची सोय करावी. अशाच केसमध्ये[26] मद्रास उच्च न्यायालयाने संरक्षणाचा आदेश देताना पोलिसांना कुलुप तोडण्याचा निर्देश दिला. घराला कुलुप लावणे याचा अर्थ त्या महिलेस संरक्षण आदेशाच्या फायद्यापासून वंचित ठेवणे असा होतो. |

**<u>आर्थिक आदेशः</u>**

- आर्थिक मदतीसाठीच्या कुठल्याही आदेशाची प्रत न्यायालयाकडून पीडिता राहत असलेल्या नजिकच्या पोलीस स्टेशनवरील प्रभारी अधिकाऱ्यास पाठवली जावी. असा

---

24 सदर कायदा कलम 19(3)

*25* सदर कायदा कलम 19(4)

26 <u>पी. बाबू वेंकटेश वि.राणी, AIR</u> 2008 (NOC) 1772 (Madras H.C)

आदेश पोलिसांनी स्वीकारला पाहिजे आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी त्याचा पाठपुरावा केला पाहिजे.

- सदर कायद्याच्या कलम 20 अन्वये आर्थिक मदतीच्या आदेशाची अंमलबजावणी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १२८ कलमान्वये विहित केलेल्या कारवाईप्रमाणे म्हणजेच पोटगीच्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या कारवाईनुसार (भारतीय दंड संहिता कलम १२५ अन्वये) केली जावी. वर उल्लेख केल्याप्रमाणे हा फौजदारी कारवाईचा भाग असल्याने, अशा आदेशाच्या अंमलबजावणीस जसे लागू असेल तसे पीडितेस किंवा संरक्षण अधिकाऱ्यांना पोलिसांनी विनंतीनुसार पाठिंबा दिलाच पाहिजे.

- या व्यतिरिक्त , कलम 20(1) अन्वये दिल्या गेलेल्या आर्थिक साहाय्याच्या आदेशाचे जर जाब देणाऱ्याने पालन केले नाही तर न्यायालय त्याच्या पगारातून ते पैसे दिले जावेत असा आदेश देते. असे आदेश, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३१ अन्वये घालून दिलेल्या पध्दतीनुसार (दंड म्हणून पैसे वसूल करणे) लागू केले जातात.

**<u>मुलांचा तात्पुरता ताबा आदेश</u>**

- मुलांचा ताबा आदेश जरी तात्पुरता असेल तरी देखील जर पीडित महिला जाब देणाऱ्याच्या धमक्या आणि हिंसेच्या विरुध्द पोलिसांचे साहाय्य मागत असेल, तर तशी मदत करावी.

**<u>भरपाई</u>**

- आर्थिक आदेशाच्या प्रमाणेच न्यायालयाच्या निर्देशाने भरपाईच्या आदेशाची अंमलबजावणी केली जावी.

➢ **आदेशाचा भंग झाल्यास कारवाई**

सदर नियमाच्या नियम 15(7) प्रमाणे कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करण्यास प्रतिपक्षाने किंवा त्याच्या वतीने कोणीही विरोध केल्यास खालील गोष्टी होऊ शकतात

- संरक्षण आदेशाचा किंवा अंतरिम संरक्षण आदेशाचा भंग झाला आहे असे गृहीत धरले जाईल. त्यानुसार सदर कायद्याच्या कलम 31 प्रमाणे दखलपात्र गुन्हा समजला जाईल. याचा अर्थ असा होतो की अशा प्रकारे, सदर कायद्याखाली न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशाचा भंग केल्याची तक्रार आली तर तो सदर कायद्याच्या 31

कलमान्वये अपराध मानला जाईल आणि फौजदारी कारवाई करण्यात येईल. सदर सदर कायद्याच्या कलम ३२ प्रमाणे हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा होतो

- सदर नियमाच्या नियम 15(4) अन्वये पीडिता अशा आदेश भंगाची तक्रार थेट पोलिसांकडे करू शकते
- अशी तक्रार केल्यानंतर नेहमीप्रमाणे फौजदारी चौकशी होऊन जाब देणाऱ्यास अटक व्हावी आणि त्याला न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे उभे केले जावे.
- न्यायालयाचे आदेश असूनही हिंसा चालू राहिली तर अशा प्रसंगाचे सदर कायदा कलम 31 नुसार नवे एफआयआर / तक्रार करता येते आणि विहित केल्याप्रमाणे पोलिसांनी फौजदारी कारवाई करावी.

| अन्य आदेशांचा भंग |
|---|
| मीराने पतीने पोटगी द्यावी याकरता अंतरिम आदेश मिळवला होता. तथापि, तिच्या पतीने तिला अंतरिम पोटगी दिली नाही आणि आदेशाच्या तारखेपासून एक वर्षभर अजिबात पैसे दिले नाहीत. तिने सदर कायद्याच्या 31 कलमान्वये न्यायालयाकडून आदेश मिळावा यासाठी अर्ज केला. न्यायालयाने अखेरीस तिच्या नवऱ्याला सर्व थकलेली अंतरिम पोटगीची रक्कम देण्याचा आदेश दिला.<br>कायद्यानुसार असे मान्य आहे की “अंतरिम पोटगी न देणे ही एक सातत्याने घडणारी चूक आहे. ज्या तारखेपासून पोटगीची रक्कम देय असते तेव्हापासून पोटगी भरावीच लागते/मर्यादा कालावधी लागू होतो.[27] |

➢ **न्यायालयाच्या आदेशाचा भंग झाल्यास फौजदारी परिणाम**

- प्रामुख्याने सदर कायदा हा दिवाणी कायदा असला, तरीदेखील संरक्षण आदेशाचा भंग झाल्यास, जाब देणाऱ्याला कलम ३१ नुसार शिक्षा करण्याची तरतूद आहे.
- सदर कायद्याखाली कोणताही आदेश हा हिंसा थांबवण्याकरीता दिला जातो. आदेशाचे पालन जाब देणाऱ्याने न केल्यास हिंसा थांबली नाही असे समजणे अनिवार्य आहे. आदेशाचा भंग केल्यास पीडित महिला अशा आदेशाचा भंग अपराध म्हणून पोलिसांकडे

[27] अनिल सोलंकी वि. इला सोळंकी, RLW 2010 (3) Raj 2533

थेट किंवा संरक्षण अधिकाऱ्यांमार्फत मांडू शकते. आणि फौजदारी कारवाई सुरू होऊ शकते. भंग करणाऱ्यास हा फौजदारी गुन्हा असल्याने गुन्हा दंड संहितेच्या १९७३ अन्वये लागू असलेल्या तरतुदींनुसार त्वरित अटक करता येते.

## ५.३.२ संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर काम करणे

- **आदेश अमलात आणण्या करीता**

  सदर कायद्याखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या अंमलबजावणीसाठी संरक्षण अधिकारी पोलिसांची मदत मागू शकतात व पोलिसांनी त्यांना मदत करावी. न्यायालयाच्या आदेशामध्ये पोलिसांना अंमलबजावणीसाठी निर्देश असतील तर त्याप्रमाणे पोलिसांनी मदत करणे अनिवार्य आहे.

- **आदेशाची अंमलबजावणी झाल्यानंतर पीडितेच्या सुरक्षिततेसाठी**

  आदेशाची अंमलबजावणी झाल्यानंतर देखील पोलिसांचे कार्य संपत नाही. पोलिसांनी पीडित महिला व संरक्षण अधिकाऱ्यांबरोबर पुढील सुरक्षा नियोजन करण्याची गरज असू शकते. उदा. जाब देणाऱ्याच्या घरात राहण्याबद्दल निवासाचा आदेश असल्यास, तिथे तिने कसे सुरक्षित राहावे आणि मदत लागल्यास ती कशी आणि कोणाची घ्यावी याचे नियोजन करावे.

# परिशिष्ट

परिशिष्ट १

फॉर्म क्र. ४

[नियम 8(1)(ii)]

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ नुसार हिंसाग्रस्त व्यक्तिंच्या अधिकारांची माहिती

१. तुमच्याबरोबर राहत असलेल्या व्यक्तिकडून तुम्हाला मारहाण होत असेल तुमचा छळ होत असेल किंवा तशी धमकी दिली जात असेल तर ती तुमच्यावर होणारी हिंसाच आहे. सदर कायद्यापासून तुम्हाला सर्व प्रकारच्या हिंसेपासून संरक्षण मिळणे व त्याची सर्व माहिती, मार्गदर्शन, मदत व सहकार्य मिळणे हा तुमचा अधिकार आहे.
२. तुमच्याशी किंवा तुमच्यावर अवलंबून व तुमच्या ताब्यात असलेल्या मुलांशी तुमच्याबरोबर राहणारी व्यक्ती पुढील कोणत्याही प्रकारचे वर्तन करत असेल तर तुम्हाला या कायद्याअंतर्गत संरक्षण व मदत मिळवण्याचा अधिकार आहे.

अ. शारीरिक छळ

- मारहाण,
- चापट्या मारणे
- झोडपणे
- चावणे
- ठोसे, बुक्क्या मारणे
- लाथा मारणे, ढकलणे
- भिंतीवर किंवा जमिनीवर धरून आदळणे
- किंवा याव्यतिरिक्त शरीराला वेदना व दुखापत होईल असे कोणतेही वर्तन

ब. लैंगिक छळ

- उदाः जबरदस्तीने लैंगिक संभोग
- अश्लील साहित्य पाहण्याची जबरदस्ती करणे
- तिच्या सन्मानास धक्का पोचेल
- तिला नकोसे होईल असे कोणतेही वर्तन
- लहान मुलांचा लैंगिक छळ

क. शाब्दिक किंवा भावनिक छळ

- उदाः अपमान करणे
- नावे ठेवणे
- वागणूक व चारित्र्यावर शिंतोडे उडवणे
- वाईट चालीची आहे असे ठरवणे
- हुंडा आणला नाही म्हणून अपमान करणे
- तुम्हाला किंवा तुमच्या ताब्यातील मुलांना शाळा, कॉलेज किंवा इतर कोणत्याही ठिकाणी जाण्यास मनाई करणे
- नोकरी / व्यवसाय करू न देणे
- असलेली नोकरी / काम सोडण्याची जबरदस्ती करणे,
- दररोजच्या संपर्कातील व्यक्तिंना भेटू न देणे,
- तुम्हाला नको असताना, तुम्हाला नको असलेल्या मुलाशी लग्न करण्याची तुमच्यावर जबरदस्ती करणे,
- तुमच्या पसंतीच्या जोडीदाराबरोबर लग्न करण्याची परवानगी न देणे,
- घरातील लोकांनी किंवा नातेवाईकांनीच ठरवलेल्या मुलाशी, त्यांनी सांगितलेल्या पध्दतीनेच लग्न करण्याची जबरदस्ती करणे,
- त्यांच्या मनाप्रमाणे न वागल्यास आत्महत्या करेन अशी धमकी देणे,
- किंवा इतर कोणत्याही पध्दतीचा भावनिक व शाब्दिक छळ .

ड. आर्थिक छळ

- उदाः तुमच्या व तुमच्या मुलांच्या दैनंदिन खर्चासाठी तुम्हाला पैसे न देणे
- तुमच्या व तुमच्या मुलांच्या अन्न, वस्त्र, व निवारा, औषधपाणी अशा साध्या गरजाही न पुरवणे.
- तुम्हाला नोकरी व्यवसाय करू न देणे
- तुमच्या नोकरी व्यवसायामध्ये अडथळे आणणे,
- कोणताही नवीन व्यवसाय सुरू करू न देणे,
- तुमचा पगार मजुरी तुमच्याकडून हिसकावून घेणे,
- तुमचा पगार , मजुरीचे पैसे वापरण्याची तुम्हाला परवानगी न देणे,

- घराच्या काही भागात प्रवेश करू न देणे, किंवा तो भाग वापरण्याची परवानगी न देणे
- कपडे भांडी किंवा इतर दैनंदिन गरजेच्या वस्तु वापरण्याची परवानगी न देणे
- भाड्याच्या घरात राहत असताना घरभाडे न भरणे,
- याप्रकारचे इतर कोणतेही वर्तन

३. क्र.२ मधील वर्णनानुसार तुमच्याबरोबर राहत असलेल्या किंवा राहत होत्या अशा कोणत्याही व्यक्तिने तुमचा छळ केल्यास त्याच्या विरुध्द तुम्हाला पुढीलपैकी एक अथवा सर्व प्रकारचे आदेश मिळवता येतील.

(अ) कलम १८ नुसार

१. तुमचा व तुमच्या मुलांचा होणारा छळ ताबडतोब थांबवणे.
२. स्त्री–धन, दागिने, कपडे इ. तुमच्या वस्तु तुम्हाला परत करणे,
३. तुमच्या परवानगीशिवाय तुमचे बँकेचे खाते किंवा लॉकर न वापरणे,

(ब) कलम १९ नुसार

१. तुम्ही राहत असलेल्या घरात राहण्यास तुम्हाला मनाई न करणे
२. शांतपणे घरात राहण्यास तुम्हाला कोणतेही अडथळे न आणणे,
३. तुम्ही राहत असलेल्या घराची कोणत्याही प्रकारे तोडफोड न करणे, किंवा त्या घराची विक्री व तत्सम व्यवहार न करणे,
४. भाडे तत्त्वावर घरात राहत असल्यास वेळेवर भाडे भरणे, किंवा तुमच्या राहण्यासाठी तुम्हाला सोईची असेल व पूर्वीच्या घरातील सर्व सुविधा उपलब्ध असतील अशी राहण्याची पर्यायी व्यवस्था करणे,
५. कोर्टाच्या परवानगीशिवाय राहत्या घराचे कोणतेही हक्क हस्तांतरित न करणे,
६. राहत्या घरावर कोणतेही कर्ज न काढणे, किंवा कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा त्या घरावर न चढवणे,
७. तुमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असे खालीलपैकी आदेश

(क) कलम १९ नुसार सर्वसाधारण आदेश

१. तक्रार केल्यानुसार कौटुंबिक हिंसेचे प्रकार ताबडतोब थांबवणे.

(ड) कलम १९ नुसार विशेष आदेश

१. तुमच्या राहत्या ठिकाणापासून व कामाच्या ठिकाणापासून त्याने दूर राहणे
२. तुम्हाला भेटण्याचा कोणताही प्रयत्न न करणे
३. तुमच्याशी इ-मेल, पत्र, फोन अशा कोणत्याही माध्यमातून संपर्क साधण्याचा प्रयत्न न करणे,
४. तुमच्या लग्नाची बोलणी न करणे, त्यांच्या पसंतीच्या स्थळाला भेटण्याची लग्नसंदर्भात भेटण्याची जबरदस्ती न करणे,
५. मुलांच्या शाळेपासून किंवा तुम्ही मुले जिथे नेहमी वावरतात अशा ठिकाणांपासून त्याने स्वतःला दूर ठेवणे,
६. त्याच्याजवळ असलेली शस्त्रे, बंदूक, पिस्तूल, किंवा इतर धोकादायक वस्तू त्याने ताबडतोब जमा करणे,
७. बंदूक, पिस्तूल, शस्त्रे किंवा कोणत्याही धोकादायक वस्तू स्वतःजवळ बाळगणे
८. दारू, ड्रग्ज, किंवा कौटुंबिक छळाला खतपाणी मिळेल असे कोणतेही व्यसन न करणे
९. तुमच्या व तुमच्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असे इतर आदेश

(इ) कलम २० आणि २१ नुसार आर्थिक तरतुदींसाठी अंतरिम आदेश

१. तुमच्या व तुमच्या मुलांच्या उदरनिर्वाहासाठी खर्च
२. तुम्हाला कौटुंबिक हिंसेमुळे झालेल्या दुखापतीसाठी औषधपाण्याचा खर्च व दुखापतीची नुकसान भरपाई,
३. मानसिक छळ व भावनिक ओढाताणीची नुकसान भरपाई
४. हिंसेच्या काळात नोकरी, व्यवसाय, मजुरीतील बुडालेल्या उत्पन्नाची भरपाई
५. हिंसेच्या प्रकारात घराची, घरातील वस्तुंची झालेली तोडफोड, तुमच्या हिसकावून घेतलेल्या वस्तू या सर्वांचा मोबदला.

टीपः १. वरीलपैकी आदेश हे तुम्ही न्यायालयात तक्रार दाखल केल्यावर तात्पुरत्या, अंतरिम स्वरूपाचे मिळू शकतात.

२. या फॉर्म क्र. १ मध्ये उल्लेख केलेल्या तक्रारीला कायद्यामध्ये कौटुंबिक घटना अहवाल असे म्हटले आहे.

४. तुमच्यावर जर कौटुंबिक हिंसा होत असेल, तर या कायद्यानुसार तुमचे हक्क पुढीलप्रमाणे आहेत

१. कलम ५ नुसार सर्व सुविधा तसेच सुरक्षा अधिकारी व सेवादायी संस्थांकडून सर्व प्रकारच्या सेवा सुविधा मिळणे.

२. कलम ९ व १० नुसार तक्रार दाखल करताना व न्यायालयामध्ये अर्ज दाखल करताना सुरक्षा अधिकारी, जवळच्या पोलीस चौकीतील अधिकारी व सेवादायी संस्थांकडून मदत व मार्गदर्शन मिळणे.

३. कलम १८नुसार तुमच्या व तुमच्या मुलांच्या सुरक्षिततेची हमी घेतली जाणे,

४. तुम्हाला व तुमच्या मुलांना जर काही असुरक्षितता जाणवत असेल तर त्यापासून सुरक्षितता मिळणे.

५. ज्या ठिकाणी तुमच्यावर हिंसा झाली त्या ठिकाणी तुमच्या राहत्या घरात सुरक्षित राहता येणे, कलम १९ नुसार त्या घरात तुम्ही शांततेने राहण्यात अडथळे न आणले जाणे, अडथळे आणणाऱ्या पुरुषाने त्या घरापासून दूर राहावे असा त्याच्या विरुध्द आदेश मिळणे,

६. कलम १८नुसार तुमचे स्त्री धन, दागिने, कपडे इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू व घरातील आवश्यक सामान इत्यादींचा ताबा तुम्हाला परत मिळणे.

७. कलम ६,७,९,१४ नुसार तुमच्या गरजेनुसार वैद्यकीय सुविधा, आधारगृह,समुपदेशन,कायदेविषयक मोफत सेवा उपलब्ध होणे.

८. कलम १८मध्ये सांगितल्याप्रमाणे, तुमचा छळ करणाऱ्या व्यक्तीस त्याने तुमच्याशी कोणताही संपर्क साधू नये असा आदेश मिळणे,

९. कलम २२नुसार कोणत्याही शारीरिक ,मानसिक, दुखापतीची किंवा आर्थिक नुकसानीची भरपाई मिळणे,

१०. कलम १२, १८, १९, २०,२१, २२, २३ नुसार सेवा मिळण्यासाठी थेट न्यायालयात अर्ज दाखल करणे.

११. तुम्ही अथवा तुमचे मूल यांनी काही वैद्यकीय मदत घेतली असल्यास त्याचा दाखला,कोर्टामध्ये अर्ज दाखल केला असल्यास किंवा कोणतीही तक्रार दाखल केली असल्यास त्याची निःशुल्क प्रत मिळणे.

१२. कौटुंबिक हिंसेसंदर्भात कोणत्याही अधिकाऱ्यानी एखादी नोंद घेतली असेल तर त्याची प्रत मिळणे.

१३. तुमचा जीव धोक्यात असेल तेव्हा त्या परिस्थितीतून तुमची सुटका करण्यासाठी सुरक्षा अधिकारी व पोलीस यांची मदत व मार्गदर्शन मिळणे.

५. हा फॉर्म तुम्हाला देणाऱ्या व्यक्तीने तो तुम्हाला देण्यापूर्वी त्यामध्ये खालील माहिती भरून द्यायची आहे.

| संस्थेचे नाव | सेवादायी संस्था | संपर्कासाठी तपशील |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

---

परिशिष्ट २

**कौटुंबिक हिंसाचारा पासून महिलांचे संरक्षण कायदा २००५.**

पोलीस विभागाचा सहभाग

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन परिपत्रक क्र. डिव्हीए ०२०८/प्र.क्र.१७६/ विशा-६.**

**मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक :१४ नोव्हेंबर, २००८.**

**परिपत्रक**

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा,२००५ ची अंमलबजावणी दि.२६ ऑक्टोबर, २००७ पासून संपूर्ण देशात करण्यात आली आहे. सदर कायद्यात संरक्षण अधिकारी, पोलीस तसेच दंडाधिकारी यांची कर्तव्ये विस्तृतपणे नमूद केली आहेत. तथापि सदर कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या प्रकरणासाठी जरी संरक्षण अधिकारी आणि सेवा पुरवणारे व्यवस्थापनाचे प्रयोजन केले असलेतरी त्याचा उद्देश समांतर प्राधिकरण स्थापन करण्याचा नाही. सबब सद्या अस्तीत्वात असलेले व्यवस्थापन विशेषत: पोलीसांची प्रस्तुत कायद्याच्या व महिलांवरील अत्याचाराच्या प्रतिबंधासाठी सद्या अस्तित्वात असलेल्या इतर कायद्यांची अंमलबजावणी करण्यात महत्वाची भूमिका आहे.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ मधील सदर कायद्याच्या अंमलबजावणीत पोलीसांचा सहभाग पुढील प्रमाणे आहे :-

१) कलम.५ पोलीसांना तक्रार प्राप्त झाल्यास अथवा कौटुंबिक हिंसाचाराच्या ठिकाणी उपस्थित असल्यास प्रस्तुत कायद्याने बाधित व्यक्तीस प्रदान केलेल्या अधिकारांची माहिती बाधित व्यक्तीस पोलीसांनी द्यावी मात्र गुन्हा दखल-पात्र घडल्याची माहिती मिळाल्यानंतर कायद्यानुसार अशा प्रकरणावर कार्यवाही करण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या कर्तव्यापासून पोलीस अधिकाऱ्यांची सुटका या कायद्याच्या कोणत्याही कलमामुळे होत नाही अशी तरतूद या कलमात आहे.

२) कलम-९ (१) (ब) :- संरक्षण अधिकाऱ्याने कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेच्या अहवालाची एक प्रत संबधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यास पाठवावी.

३) कलम १९ (५) :- कलम १९ (१) अन्वये रहिवासाचे आदेश देताना किंवा कलम १९(२) अन्वये बाधित व्यक्तीला संरक्षण किंवा सुरक्षा पुरविण्याचे आदेश देताना अथवा प्रतियादीस कलम १९(३) अन्वये हमीपत्र द्यायचे आदेश पारित करतांना न्यायालय जवळील पोलीस ठाण्याचे अंमलदार यास बाधित व्यक्तीस संरक्षण देण्याचे किंवा सदर आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत बाधित व्यक्तीस सहकार्य करण्याचे निर्देश देऊ शकेल.

४) कलम १९ (७) :- संरक्षण आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करण्याबाबत दंडाधिकारी पोलीस ठाण्याच्या अंमलदारांला निर्देश देऊ शकतील.

५) कलम २० (४) :- दंडाधिकारी आर्थिक मदतीच्या आदेशाची प्रत संबंधित पोलीस ठाण्याला देतील.

६) कलम ३१ व ३२ :- "संरक्षण आदेशाचे" उल्लंघन हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा करण्यात आला आहे.

तसेच उक्त तरतूदींबरोबरच सदर कायद्यांतर्गत तयार केलेल्या नियमात पोलीसांची भूमिका पुढील प्रमाणे नमूद केलेली आहे.

१) आणिबाणीच्या परिस्थितीत "संरक्षण अधिकारी" किंवा "सेवा देणारा" कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेच्या ठिकाणी जाऊन घटनेचा अहवाल तयार करण्यासाठी पोलीसांचे सहकार्य मागू शकतो.

२) कौटुंबिक हिंसाचारात वापरलेले हत्यार जप्त करण्यासाठी संरक्षण अधिकारी पोलीसांची मदत घेईल.

या कायद्याच्या वापर संरक्षण अधिकाऱ्याच्या नियुक्तीच्या प्रक्रियेपूरता मर्यादित नाही. बाधित व्यक्ती सदर कायद्याच्या तरतूदी प्रस्थापित यंत्रणेमार्फत अर्थात पोलीस व दंडाधिकारी यांचे मार्फत परस्पर कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार नोंद करण्यासाठी करता येईल. तसेच प्रस्तुत कायद्यांतर्गत सहाय्य मिळण्यासाठी बाधित व्यक्ती परस्पर दंडाधिकारी यांचे कडे अर्ज करु शकतो.

कौटुंबिक हिंसाचार कायदा -२००५ च्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी पोलीस विभागाशी संबधित तरतुदी सर्व पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून सदर कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( म. ध. कांबळे )
उप सचिव, गृह विभाग ( विशेष )
महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, (म.अ.प्र.वि.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक, (परिक्षेत्रीय ),
४) सर्व पोलीस आयुक्त,
५) सर्व पोलीस अधिक्षक
६) सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
७) निवड नस्ती विशा-६, गृह विभाग, मंत्रालय मुंबई.

परिशिष्ट ३

**फॉर्म नं.५**
**सुरक्षा नियोजन तक्ता.**

See rule 8(1)(iv)

| अ.क्र | स्त्रीवर झालेली हिंसा | 'अ' रकान्यामध्ये दिलेल्या हिंसेचा तिच्यावर झालेला परिणाम | हिंसेच्या संदर्भात स्त्रीला जाणवणार धोका | सुरक्षीततेसाठी घेण्याची खबरदारी | न्यायालया कडून मिळविण्याचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | ड | इ |
| १. | शारीरिक हिंसा | असा हिंसक प्रकार परत घडण्याची भीती | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| २. | लैंगिक छळ व शिव्या तिला अपमानास्पद वाटेल असे इतर वर्तन | १. नैराश्य येईल,<br>२. अशी हिंसा परत होण्याची भिती<br>३. लैंगिक छळाच्या प्रयत्नांनाही तोड द्यावे लागेल. | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| ३. | तिच्यावर हत्याराने वार करण्याचा प्रयत्न करणे | १. शारीरिक दुखापत<br>२.मानसिक दडपण आणि अस्वास्थ्य<br>३. इतर काही, | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल,<br>३. जास्त दुखापत होईल,<br>४. इतर काही | | |
| ४. | मुलांना मारहाण करणे | १. मुलांना दुखापत होईल.<br>२. त्यांच्या मनावर वाईट परिणाम होईल,<br>३. इतर काही. | १. पुन्हा मारहाण होऊ शकते<br>२. त्यांच्या हिंसक वागणूकीमूळे घरातील वातावरण बिघडेल त्यांचा मुलांवर वाईट परिणाम होतो<br>३. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | आत्महत्या करण्याची धमकी हिंसाग्रस्त स्त्रीला दिली जाणे. | १. घरातील वातावरण तणावाचे होते<br>२. सुरक्षीततेला धोका निर्माण होतो<br>३. इतर काही | १. आत्महत्येचा प्रयत्नं करेल<br>२. पुन्हा पुन्हा प्रयत्नं करेल<br>३. इतर काही. | | |
| ६. | आत्महत्येचा हिंसक व्यक्तीने प्रयत्नं करणे | १. घरामध्ये हिंसक वातावरण होते<br>२. असुरक्षीतता भिती,नैराश्य, वैफल्य आणि मानसिक धक्का स्त्ीला बसू शकतो.<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा प्रयत्नं करेल,<br>२. मानसिक ताण,दुःख.<br>३. इतर काही. | | |
| ७. | मानसिक आणि भावनिक छळ उदा.अपमान खिल्ली उडवणे,नावे ठेवणे, मुलगा होत नाही म्हणून अपमान करणे वाईट चालीची असल्याचे खोटे आरोप करणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,तीव्र,दुःख होईल<br>३. मुलांच्या विकासासाठी हे वातावरण योग्य नसेल<br>४. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा छळ,होईल<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही. | | |
| ८. | हिंसाग्रस्त स्त्री,तिची मुले किंवा तिचे नातेवाईक यांना इजा पोहोचवण्याच्या धमक्या देणे | १. सतत काळजी वाटत राहील<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही | १. धमकी दिल्याप्रमाणे खरंच काही इजा पोहोचवेल<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही | | |
| ९. | शाळा,महाविद्यालय किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक उपक्रमात सहभागी होऊ न देणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,तीव्र,दुःख होईल<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा असा त्रास दिला जाईल.<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | तिच्या मनाविरुध्द लग्न करण्यास भाग पाडणे,तिच्या पसंतीच्या जोडीदाराबरोबर लग्न करू न देणे,घरातील लोकांच्या पसंतीच्या मुलाशी लग्न करण्याची जबरदस्ती करणे | १. वैफल्य,नैराश्य येऊ शकते,<br>२. मानसिक ताण,दुःख<br>३. इतर काही. | १. पुन्हा पुन्हा असा त्रास दिला जोईल.<br>२. मानसिक ताण दुःख<br>३. इतर काही. | | |
| ११ | मुलांना किडनॅप करण्याची,पळवून नेण्याची धमकी देणे | १. मुलांची सतत काळजी लागुन राहील.<br>२. मुलांच्या सुरक्षीततेला धोका निर्माण होईल.<br>३. इतर काही | १. मुलांना पळवून नेले◌े जाईल.<br>२. इतर काही | | |
| १२ | हिंसाग्रस्त स्त्रीला, तिच्या मुलांना किंवा तिच्या नातेवाईकांना मारहाण,दुखापत करणे | १. पुन्हा मारहाण होईल अशा दडपणाखाली सतत रहावे लागू शकते.<br>२. इतर काही. | १. पुन्हा हिंसक प्रकार घडेल<br>२. जास्त गंभीर स्वरूपात होईल<br>३. जास्त दुखापत होइ◌्◌्ल<br>३. इतर काही. | | |
| १३ | हिंसक व्यक्तीच्या व्यसनांमूळे होणारा त्रास | १. तो त्यं◌ाच्या व्यसनामूळे मारहाण किंवा<br>२. इतर काही त्रास देईल याची सतत भिती आणि दडपण येते<br>३. दैनंदिन आयुष्य सुरळीत राहू शकत नाही.<br>३. इतर काही | १. व्यसन केल्याचे निमित्त सांगून हिंसक वर्तन सहन करावे लागू शकते.<br>२. व्यसन केल्यावर अधिक त्रासदायक वर्तन करेल<br>३. घरखर्चासाठी तिला तो पैसे देणार नाही.<br>२. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | त्याची वृत्ती गुन्हेगारी असेल यापूर्वी गुन्हेगारी रेकॉर्ड असेल | १. हिंसा होईल अशी सततची भिती काळजी वाटत राहील.<br>२. सुडवृत्तीने तो वागेल अशी भिती | १. कायदे नियमांच्या विरोधात वागण्याची वृत्तीच असल्याने न्यायालयाने हिंसा थांबवा असा दिलेला आदेश पाळेल याची खात्री देता येत नाही.<br>२. हिंसाग्रस्त स्त्री,तिची मुले त्याच्या पासून धोका होऊ शकतो<br>२. इतर काही. | | |
| १५ | अन्न,वस्त्र,निवारा औषधे,अशा दैनंदिन खर्चासाठी तो पैसे देणार नाही | | १. मुलाच्या आणि स्वतःच्या गरजा भागवताना खूप ओढाताण होऊ शकते<br>२. इतर काही. | | |
| १६ | तिला नोकरी व्यवसाय करू दिला जाणार नाही,रस असलेल्या कामात अडथळे आणले जातील | १. स्वतःच्या आणि मुलांच्या किमान गरजा पुर्ण करू शकणार नाही<br>२. इतर काही. | १. मुलांच्या आणि स्वतःच्या गरजा भागवताना खूप ओंढाताण होऊ शकते<br>२. इतर काही. | | |
| १७ | घरातून घालवून देणे घराचा ठरावीक भाग वापरण्यास परवानगी न देणे | १. स्त्री व मुले बेघर होण्याची भिती<br>२. घराच्या ठरावीकच भागात कोंडल्यासारखे वावरावे लागू शकते | १. स्त्रीची आणि तिच्या मुलांची सुरक्षीतता धोक्यात येते,<br>२. मुलांसाठी आणि स्वतःसाठी किमान निवऱ्याची सोय करताना खूप प्रयत्नं करावे लागतील.<br>२. इतर काही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | कपडे,भांडी व इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू वापरण्याची परवानगी न देणे | १. तिच्या वस्तुंवर तिचा ताबा राहणार नाही.<br>२. त्या सर्व वस्तु परत आणण्याची ऐपतही नसेल. | १. तो त्या वस्तु विकुनही टाकू शकेल<br>२. इतर काही. | | |
| १९ | भाडेतत्वावर घरात रहात असेल तर घरभाडे न भरणे | १. घरभाडे न भरल्यामूळे घर सोडावे लागू शकते<br>२. राहण्याची पर्यायी व्यवस्था न होणे<br>३. पुन्हा स्वतः भाडयाने घर घेण्यासाठी पैसे नसणे | १. निवारा गमवेल<br>२. इतर काही | | |
| २० | तिचे स्त्रीधन व इतर मौल्यवान वस्तू तिच्या परवानगी शिवाय विकल्या जाऊ शकतील | १. तिच्या मौल्यवान वस्तू तिच्याकडे राहणार नाही.<br>२. इतर काही. | १.तिच्या वस्तू तिच्यापासून कायमच्या हिरावून घेतल्या जाऊ शकतील.<br>२. इतर काही. | | |
| २१ | तिचे स्त्रीधन तिच्याकडून काढून घेणे | १. ती तिच्या मौल्यवान वस्तूपासून वंचित राहील.<br>२. इतर काही | १. तो तिच्या सर्व वस्तु विकून टाकील किंवा त्यांची नासधूसही करेल.<br>२. त्या तिला कधीच मिळणार नाहीत अशी तिला भीती काळजी वाटू शकते.<br>३. इतर काही. | | |
| २२ | दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेला आदेश तो डावलून टाकेल | १. इतर काही | १. इतर काही | | |

**हिंसाग्रस्त स्त्रीची सही** **संरक्षण अधिकारी / सेवादायी संस्था**

कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण नियम २००६

परिशिष्ट ४

# Form 1

# अर्ज १

(नियम ५ (१) आणि १७ (३) पहा)

कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये

कलम ९ (ब) आणि ३७८ (२) (क) नुसार

## कौटुंबिक घटना अहवाल

१) **पीडित व्यक्ती बाबतचा तपशील:**

१. पीडित व्यक्तीचे नाव -

२. वय -

३. लग्नानंतरचा सामायिक घराचा पत्ता -

४. सध्याचा पत्ता -

५. दुरध्वनी क्रमांक

**२) प्रतिवादीची सविस्तर माहिती:**

| अ क्र | नाव | प्रतिवादी पीडीत व्यक्ती बरोबर नाते संबंध | पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**३)पीडीत व्यक्तीच्या मुलांविषयी सविस्तर माहिती:**

अ) मुलांची संख्या :

ब) मुलांविषयी सविस्तर माहिती :

| अ.क्र | नाव | वय | लिंग | मुलाचे सध्याचे वास्तव्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## ४) कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना :

**१) शारीरीक हिंसाचार:-**

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | कुठल्याही प्रकारची दुखापत झाली असल्यास कृपया स्पष्टीकरण देणे | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## २)लैगिंक हिंसाचार

चौकोनात ( ✓) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसाचाराचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | | | ▪ सक्तीने लैंगिक संबंध ठेवणे<br>▪ अश्लिल चित्र बघण्यास सक्ती करणे<br>▪ दुसऱ्याच्या मनोरंजनासाठी तुमचा वापर केला असल्यास<br>▪ लैंगिक संबंधावद्दल इतर काही कृती अश्लिल शब्द वापरणे.<br>▪ अपमाणित करणे किंवा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | इतर काही तुमच्या स्वाभिमानाला ठेच पोहचविणे (कृपया खाली दिलेल्याजागेवर या बाबतची सविस्तर माहिती देणे) | |

## ३)शाब्दिक आणि भावनिक हिंसाचार

चौकोनात ( ✓ ) योग्य खुन करावी.

| अ.क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ चारित्रयावर संशय घेणे/ वागणुकीबद्दल दोषी धरणे<br>▪ हुंडा न आणल्याबद्दल अपमाणास्पद वागणुक देणे, इत्यादी<br>▪ मुलगा होत नाही म्हणुन अपमान करणे<br>▪ मुल होत नाही म्हणुन अपमान करणे<br>▪ घालुन पाडुन बोलणे, अपमानकारक, उपहासणात्मक किंवा अपशब्द वापरणे, मानहानी करणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ थट्टा करणे<br><br>▪ नावे ठेवणे<br><br>▪ शाळा कॉलेज किंवा इतर शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ नोकरी करु देण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ घराबाहेर पडण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ दुसऱ्या विशिष्ट व्यक्तीस भेटण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ तुमच्या इच्छेविरुद्ध लग्न करण्याची सक्ती करणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ तुम्ही निवडलेल्या व्यक्तीबरोबर लग्न करण्यास प्रतिबंध करणे<br><br>▪ इतर मानसिक किंवा शाब्दिक छळ असल्यास (कृपया त्याचे स्पष्टीकरण खालील दिलेल्या जागेवर लिहिणे | |

## ४) आर्थिक हिंसाचार

चौकोनात ( ✓ ) योग्य खुन करावी.

| अ. क्र. | दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ | कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती | हिंसेचा प्रकार | तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ तुमच्या व मुलाच्या पालन पोषणासाठी घरखर्च न देणे<br>▪ तुम्हाला व तुमच्या मुलांना जेवण व औषध इत्यादी उपलब्ध करुन न देणे<br>▪ तुम्हाला जबरदस्तीने घराबाहेर काढणे<br>▪ घराचा कुठलाही भाग वापरण्यास प्रतिबंध करणे<br>▪ तुम्ही करत असलेली नोकरी /काम सोडण्यास भाग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पाडणे /प्रतिबंध करणे<br>▪ नोकरी करण्यास परवानगी न देणे<br>▪ भाड्याच्या घरात राहत असल्यास भाडे न भरणे<br>▪ तूम्हाला कपडे किंवा इतर घरगुती वस्तु वापरु न देणे<br>▪ तुमच्या परवाणगीशिवाय तुमचे स्त्रीधन किंवा इतर मौल्यवान वस्तु विकणे किंवा गहाण ठेवणे<br>▪ बळजबरीने तुमचा पगार,कमाई किंवा मजुरी घेणे<br>▪ बिल न भरणे उदा. लाईट बिल इत्यादी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ▪ इतर आर्थिके छळ(कृपया त्याचे स्पष्टीकरण खाली दिलेल्या जागेवर लिहिणे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

## (४) हुंडयासंबंधी देण्यात येणारा त्रास-

| **अ.क्र.** | **दिनांक व ठिकाण हिंसाचार झाल्याची वेळ** | **कौटुंबिक हिंसाचाराला कारणीभुत व्यक्ती** | **हिंसेचा प्रकार** | **तपशील** |
|---|---|---|---|---|
| १. | | | ▪ हुंडयाची मागणी करणे (कृपया याबाबत विवरण दयावे) | |
| २. | | | ▪ हुंडयाबाबत इतर काही माहिती असल्यास कृपया सविस्तर माहिती दयावी | |
| ३ | | | ▪ हुंडयाचे साहित्य, स्त्रीधन, इ. बाबतची सविस्तर माहिती या अर्जासोबत जोडलेली आहे का?<br>होय<br>नाही | |

### ५) कौटुंबिक हिंसाचाराबाबत तुमच्या व मुलांविषयी इतर काही माहिती असल्यास:-

| | |
|---|---|
| १. | |

### ६) सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी

| कागदपत्रांची नावे | दिनांक | इतर सविस्तर माहिती |
|---|---|---|
| कायदेशीर वैदयकीय प्रमाणपत्र | | |
| डॉक्टरांचे प्रमाणपत्र किंवा इतर कोणतीही डॉक्टरांनी सांगितलेली औषधे | | |
| इतर काही कागदपत्रे असल्यास | | |
| | | |
| | | |

### ७) कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रियांचे संरक्षण अधिनियम २००५ तुम्हाला गरज असलेले आदेश

| अ.क्र | आदेश | होय/नाही | इतर काही |
|---|---|---|---|
| १. | कलम 14 अन्वये | | |
| 2 | कलम 17 अन्वये | | |
| ३. | कलम 18 अन्वये | | |
| ४. | कलम 19 अन्वये | | |
| ५. | कलम 20 अन्वये | | |
| ६. | कलम 21 अन्वये | | |
| ७. | कलम 22 अन्वये | | |
| 8 | कलम 23 अन्वये | | |

## ८) तुम्हाला पाहिजे असलेली मदत

| अ.क्र. | उपलब्ध सहाय्य मदत | होय/नाही | मदतीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | समुपदेशन | | |
| २. | पोलिस मदत | | |
| ३. | फौजदारी कारवाईसाठी मदत | | |
| ४. | आधार गृह | | |
| ५. | वैदयकिय मदत | | |
| ६. | कायदयाची मदत | | |

## ९)कौटुंबिक घटना अहवाल नोंद करण्यास मदत करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याला सूचना:-

या नमुन्यातील माहितीमधुन पोलिसांच्या असे लक्षात आले की, भारतीय दंड विधान संहिता किंवा इतर कोणत्याही कायदयाने सांगितलेला गुन्हा घडला आहे तर पोलिस अधिकाऱ्याने-

(अ) हिंसाग्रस्त व्यक्तीला माहिती दिली पाहिजे की, अशा गुन्हयाबद्दल आरोपी व्यक्तीविरुद्ध फौजदारी प्रक्रिया , १९७३ (१९७४ च्या २ ) अन्वये करु शकते.

(ब)तिला फौजदारी कार्यवाही करायची नसेल तर तशी नोंद रोजनिशीमध्ये केली पाहिजे.त्यामध्ये या बाबीचा आवर्जुन उल्लेख करावा की हिंसाग्रस्त व्यक्तीचा आरोपीवर अत्यंत सलगीचा संबंध असल्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण व्हावे म्हणुन दिवाणी उपाय करण्याची तिची इच्छा आहे आणि तिने अशी विनंती केली आहे की तिला मिळालेल्या माहितीनुसार प्रथमदर्शनी माहिती अहवाल नोंदणी करण्याअगोदर सदर बाब अनिर्णित ठेवावी.

(क) हिंसाग्रस्त व्यक्तीने शारिरिक दुखापत किंवा त्रास याबाबत सांगितले असेल तर तिला त्वरीत वैदयकीय अधिकाऱ्यापासुन तिची वैदयकीय तपासणी करुन घेतली पाहिजे.

ठिकाण -

दिनांक -

पीडीत व्यक्तीची सही / अंगठा

नाव-

संरक्षण अधिकारी/ सेवादायी संस्था

सही व शिक्का

नाव-

पत्ता-

**प्रत रवाना-**

१.स्थानिक पोलिस ठाणे

२.सेवादायी संस्था / संरक्षण अधिकारी

३.पीडीत व्यक्ती

४.न्यायदंडाधिकारी